म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. २८५
सन १९२८

# यकुसुम.



REFBK-0002848
REFBK-0002848

संग्राहक व प्रकाशक.

रघुनाथ हणमंत कोटनीस.

काव्य ८५

कैवल्यमाला पुस्तक २ रें.

॥ श्रीसद्गुरुरामचंद्राय नमः ॥

# कैवल्यकुसुम.

मराठी ग्रं... संग्रह
२८४८

कैवल्याचें रोप लावियेलें द्वारीं ॥
त्याचा वेल गेला गगनावरी ॥ १ ॥
—श्रीज्ञानोबाराय.

संग्राहक व प्रकाशक
रघुनाथ हणमंत कोटनीस.

सन १९१४ इ.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व सांगली येथें कैवल्यवैभव ऑफिसांत
रघुनाथ हणमंत कोटनीस यांनीं प्रसिद्ध केलें.

Registered according to the Act XXV of 1867.

( All rights reserved by the publisher. )

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—
रघुनाथ हणमंत कोटनीस.
कैवल्यवैभव ऑफिस.
पोस्ट सांगली. ( S. M. C. )

**श्रीसद्गुरु रामचंद्रराव महाराज यरगट्टीकर व ती गु. भ. रा. हणमंतरावजी कोटनीस यांच्या सांगली येथील पादुका.**



माता वत्सल तात सात्विक अशा दोन्ही स्वरूपांतुनि ॥
होतें सद्गुरुरूप दृश्य पुरतें अर्धार्ध भागें जनीं ॥
त्या श्रीसद्गुरुच्या अनन्य भजका आतां अनन्यें मनें ॥
माझीं **श्रीहनुमंत**-नाम-गुरुला पावोत लोटांगणें ॥ १ ॥

**रघुनाथ.**

# अर्पणपत्रिका.

कैवल्यकुसुमाचा दाता श्रीसद्गुरु ॥
माझा नमस्कारु त्यांचे पायीं ॥ १ ॥

क्षीराब्धीचें जैसें घेउनी जीवन ॥
नैवेद्य अर्पण त्याचें त्यासी ॥ २ ॥

तैशापरी हा ग्रंथ श्रीगुरुसी ॥
अर्पिला प्रेमेंसी रघुनाथें ॥ ३ ॥

नोहे उतराई श्रीराम-सेवका ॥
हनुमंता एकावाक्यें शरण ॥ ४ ॥

श्रीसद्गुरु-महाराजांच्या चरणांचा
रजःकणाभिलाषी,

रघुनाथ हणमंत कोटनीस.

# प्रकाशकाचे चार शब्द.

" सांगे वडिलांची कीर्ति, तो एक मूर्ख " असें श्रीसमर्थांनीं दासबोधांत म्हटलें आहे, तें कोणत्याही हेतूनें असो. तथापि त्यांत ध्वनित केलेला मूर्खपणाचा दोष पतकरूनही मला परमपूज्य वडिलांची कीर्ति गाणें भाग आहे. माझे परमपूज्य श्रीमत् सद्गुरु तीर्थरूप हणमंरावजी तात्यासाहेब कोटनीस महाराज हे प्रसिद्ध हरिभक्त होते ही गोष्ट महाराष्ट्रांत तरी सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें त्यांची कीर्ति परभारेंच गायली जात होती व तितक्या पुरता मजवर येणारा वडिलांच्या गुणगानाचा दोष अंशतः कमी जाहला आहे. पण त्यांनीं नुकताच कैलासवास केल्यामुळें त्यांच्या शेंकडों भक्तांची झालेली श्रवणसुखाची हानी व माझी झालेली सर्वस्वहानि भरून काढण्यास कोणचाही बुद्धिवाद समर्थ होत नाहीं, ही गोष्ट माझ्या मनाच्या दुर्बळत्वाची साक्ष देत असली तरी खरी आहे.

वडिलांचें ऋण फेडणें हें मुलांचें कर्तव्य आहे, व तें पुरतेपणीं फेडल्यावांचून त्यास सुटका नाहीं ही गोष्ट खरी असल्यास मी कैलासवासी तीर्थरूपांच्या ऋणांतून कधींच मुक्त होणें शक्य नाहीं एवढें तें मोठें आहे. तथापि पुत्रधर्मानुसार त्याची अंशत फेड करावी या हेतूनें त्यांचा हा पद्यसंग्रह प्रसिद्ध करून मी त्यांच्या भक्तांपुढें ठेवीत आहें. व आणखीही उत्तरोत्तर त्यांची सेवा चालवावी असा माझा हेतु आहे. पण अशा सामान्य सेवेनें त्यांचें व्याजही फिटणार नाहीं असें होऊन मला शेकडों गर्भवास पतकरावे लागले तरी ते मी मोठ्या हौसेनें पतकरीन. मात्र जन्मोजन्मीं हेंच पितापुत्राचें नातें आपण कायम ठेवावें एवढी श्रीमत् पितृपदांपाशीं मागणी मागेन !

कै. परमपूज्य श्रीमत् सद्गुरु तीर्थरूप तात्यासाहेब महाराजांचा हा पद्यसंग्रह छापून प्रसिद्ध करण्यांत आर्यभूषण छापखान्यांच्या चालकांनीं जी तत्परता दाखविली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. त्याप्रमाणें सदर संग्रहाचीं प्रुफें तपासून व प्रस्तावना लिहून माझे प्रियमित्र साधुदास यांनीं मला उपकृतिबद्ध करून ठेविलें आहे तें परमपूज्य श्रीमत्सद्गुरु तीर्थरूप तात्यासाहेब महाराजांच्याविषयीं असलेल्या त्यांच्या अनन्य निष्ठेनें प्रेरित होऊन त्यांनीं केलें असल्यामुळें त्यांचा मी द्विगुणित आभारी आहें. शेवटीं ज्या माझ्या वंद्य तीर्थरूपांनीं सगुण रूपानें माझें संगोपन केलें त्यांनीं आपल्या निर्गुण स्थितींतही मला विसरूं नये अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना करून हें त्यांच्या पद्यसंग्रहाचें वाक्पुष्प त्यांस सादर समर्पण करितों.

सांगली,<br>
गुरुद्वादशी, शके १८४६.

सर्वांचा नम्र,<br>
रघुनाथ हणमंत कोटनीस.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| प्रस्तावना. | |
| १ श्रीसद्गुरु परमपूज्य तीर्थरूप कै. हणमंतरावजी कोटनीस महाराजकृत पद्यसंग्रह ... ... | १–२९ |
| २ श्रीसद्गुरु परमपूज्य तीर्थरूप कै. हणमंतरावजी कोटनीस महाराजकृत श्लोक ... ... | ३०–३९ |
| ३ श्रीसद्गुरु परमपूज्य तीर्थरूप कै. हणमंतरावजी कोटनीस महाराज व त्यांचे चुलते ती. कै. गु. भ. प. वामनरावजी कोटनीस यांचे दरम्यान झालेला पत्रव्यवहार ... ... ... | ४०-५४ |
| ४ व ५ श्रीसद्गुरु परमपूज्य तीर्थरूप कै. हणमंतरावजी कोटनीस महाराज यांच्या शिष्यवर्गांनीं त्यांचेवरून केलेलीं पद्यें ... ... ... | ५५–७४ |
| श्रीसद्गुरु परमपूज्य तीर्थरूप कै. हणमंतरावजी कोटनीस महाराज यांच्या निर्याणाचा अभंग व त्यांची पत्रिका ... ... ... | ७५–७६ |
| सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा. ( अष्टक ) | ७७-७८ |


## चित्रांचे पृष्ठांक.


| | |
|---|---|
| १ श्रीसद्गुरु रामचंद्रराव महाराज यरगट्टीकर व ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस यांच्या सांगली येथील पादुका ... ... ... | अर्पण पत्रिके-जवळ. |
| २ श्रीक्षेत्र सिद्धगिरी येथील श्रीसद्गुरु काडसिद्ध महाराज यांचें देवस्थान ... ... ... | ३ |

३ श्रीसद्गुरु नारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर यांची समाधी. निंबरगी ... ... ३
४ श्रीक्षेत्र चिमड येथील श्रीसद्गुरु साधुमहाराज यांचें देवस्थान. ( तापनाशी तीर्थ )... ... ४
५ श्रीक्षेत्र चिमड येथील श्रीसद्गुरु दाजीसाहेब महाराज, श्रीरामचंद्रराव महाराज यरगट्टीकर व श्रीलक्ष्मीबाई आक्कासाहेब महाराज या त्रैमूर्तींची समाधी. ... ... ... ... ३०
६ श्रीक्षेत्र चिमड येथील कै. गु. भ. प. ती. हणमंतरावजी कोटनीस यांनीं बांधविलेली धर्मशाळा ४९
७ कै. ती गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस यांचा पूजेला बसलेला फोटो ... ... ... ५१
८ कै. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस यांचा कपडे घातलेला फोटो त्यांच्या हस्ताक्षरासह. ... ५५

# प्रस्तावना.

कै. संतमणि परमपूज्य ती. हणमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेब कोटनीस महाराज यांचें नांव महाराष्ट्रांत पुष्कळांस ठाऊक झालेलें असेल. अस्खलित वक्तृत्व, फारच प्रचंड पाठांतर, उज्वल चारित्र्य, निस्सीम गुरुभक्ति, आणि अमर्याद दानशूरता इत्यादि सद्गुणांनीं मंडित असा सत्पुरुष अर्वाचीन तर्कप्राधान्य काळांत क्वचितच निपजतो अशी समजूत आहे. पण सांगलीच्या नागरिकांच्या महाभाग्यामुळें उपरिनिर्दिष्ट सद्गुणांनीं संपन्न असे सत्पुरुष हणमंतरावजी तात्यासाहेब महाराज मूळचे कर्नाटकांत जन्मलेले असून सांगलीस वकिली करण्याच्या निमित्तानें येऊन राहिले, व त्यांना कीर्तनरूपानें दोन तपांवर अखंड बोधामृत पाजून नुकतेच निजधामास गेले.

प्रस्तुत पुस्तकांत ती. संत तात्यासाहेब कोटनीस महाराजांची सर्व कविता संगृहीत झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कविता या दृष्टीनें ती कदाचित् अलीकडील कवित्वाच्या कसास उतरणार नाहीं व गणमात्रा वगैरे नियमही तिच्यामध्यें बिनचूक आढळणार नाहींत हें खरें, पण इतर साधुसंतांप्रमाणेंच अस्सल ईश्वरप्रेम तिच्यांत वाचकांस सांपडेल यांत संदेह नाहीं. "हरिनामाची वाहिरे कावड ती" वगैरे त्यांचीं कांहीं पद्यें तर फारच रसाळ उतरलीं आहेत. त्यांना कविता करण्यास फारसा वेळच शिल्लक राहत नसल्यामुळें तिची व्याप्ति एवढ्याशा पुस्तकांत झाली आहे. पण त्यांच्या भक्तांना मात्र तें एक निधानच हातांत पडल्यासारखें वाटणार आहे.

तीं. तात्यासाहेब महाराज यांचे चिरंजीव रघुनाथ हणमंत ऊर्फ बाबूराव कोटनीस यांनीं कुरुंदवाड येथील वकिली सोडून सांगलीस वास्तव्य करून वडिलांच्या पश्चात् त्यांचा कित्ता गिरविण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. आपल्या वडिलांचें हें वाङ्मयस्मारक करून इतर बंधुवर्गावर उपकार करून ठेवल्याबद्दल सर्वांतर्फे त्यांचे आभार मानून वाचकांची रजा घेतों.

सांगली,
गुरुद्वादशी, शके १८४६

साधुदास.

## (नमन) पद.

(चालः—भवतारक या तुझ्या पादुका.)

कीर्तनकाळीं गुरुपदकमलीं येतों लोटांगणीं ॥
सद्गुरु माझे चिंतामणी ॥ ध्रु० ॥
श्रीमद्रेवणसिद्ध प्रगटले शंकर पिंडींतुनी ॥
झालें काडसिद्ध सन्मुनी ॥
श्रीनारायणराव नामक शिष्या संबोधुनी ॥
केलें परमार्थाचे धनी ॥
चाल—श्रीलक्ष्मीअक्का भरती तीं पाउलें ॥
श्रीरघुनाथप्रिय गुरुबंधु तयां शोभले ॥
हें परंपरागत वैभव त्या लाधलें ॥
एका खाणींतुनी निघालें एक सारखे मणी ॥
जे का परमार्थी दिनमणी ॥ १ ॥

श्रीनारायणराव तयांचे शिष्य आले जन्मुनी ॥
श्रीरामराय हें नाम बोलती जनीं ॥
रघुनाथप्रिय गुरु पादुका चिंमड मठीं स्थापुनी ॥
रतले सद्गुरुच्या चिंतनीं ॥
चाल—जे संतसज्जनीं वतन जुनें राखिलें ॥
बहु भक्तजनांनीं फळ त्याचें चाखिलें ॥
हनुमंत कृपेनें आम्हां तें लाधलें ॥
साधुदास कवि हनुमंतचरणीं लीन होई निशिदिनीं ॥
मागें सन्मती गुणगायनीं ॥ २ ॥

॥ श्री सद्गुरुप्रसन्न ॥

# कै. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीसकृत पद्यें.

# कैवल्यकुसुम.

## प्रकरण १ लें.

### अभंग १

सद्गुरूंनीं दया बहुताचि केली ।
कृपेची साउली वर्णवेना ॥ १ ॥

माझ्या नाशासाठीं मोठा यत्न केला।
परि तो विफळ झाला गुरुकृपें ॥ २ ॥

सप्त दिन मज दीर्घ मूर्च्छा आली ।
काया व्यापियेली नाना रोगें ॥ ३ ॥

माझे अपराध सर्व क्षमा केले।
संकटीं धावले राखावया ॥ ४ ॥

---

१ सन १९२१ सालच्या मार्च महिन्याच्या सुमाराची गोष्ट. ती. हणमंतरावजी उर्फ तात्यासाहेब मोठ्या भयंकर गंडांतरांतून वांचले. त्यांना अतिशय ताप येऊन लक्षणेंही फारच विलक्षण होत होतीं. सात दिवस ते जवळजवळ बेशुद्धच होते. आपणांस कोणी तरी अभिचार-प्रयोग, विशेषतः विषप्रयोग केला होता असें त्यांनीं मागाहून बोलून दाखविलें. सातव्या दिवशीं त्यांना दृष्टांत होऊन उतार पडला व मग त्यांनीं हा अभंग केला.

जेथें राम माझा उभा वांचवाया ।
कोण गणी वायां संकटासीं ॥ ५ ॥
दासाचा हा स्वामी आक्रांतीं पावतो ।
दुःख भय हरतो । निजकृपें ॥ ६ ॥

## पद २


( चाल—काय दयाळा संशय गमला. )

चिमडक्षेत्रीं सद्गुरुमाई । जगदुद्धारा तिष्ठत राही ॥ध्रु०॥
रघुनाथप्रिय गुरुवर त्राता । कैवल्याचा पूर्ण प्रदाता ॥ १ ॥
रामचंद्रप्रभु दीनोद्धर्ता । घोर भवाचें शासनकर्ता ॥ २ ॥
मोक्ष-लक्ष्मी आक्का माउली । जन ताराया उभी राहिली ॥३॥
गुरुलिंगजंगम स्वामिकृपेची । छाया सर्वां परोपरीची ॥४॥
संसारीं जन फिरतां श्रमले । भवभय वारुनि मुक्तचि केले ॥ ५ ॥
हरिनामाची माला दिधली । आत्मस्वरूपीं वृत्ति वेधली ॥ ६ ॥
स्थावरजंगम भरली पाही । दासा दैवत त्याविण नाहीं ॥७॥

---

१ मागील पदांत ध्वनित केलेल्या विषप्रयोगानें आजारी असतांना हें पद व ह्या प्रकरणांतील बहुतेक पुढील पद्यें केलेलीं आहेत. ह्या पदांत ती. तात्यासाहेबानीं आपली गुरुपरंपरा सांगितलेली आहे. ती येणेंप्रमाणेंः– श्रीकाडसिद्ध, त्यांचे शिष्य श्रीनारायणराव भाऊसाहेब महाराज ( गुरुलिंगजंगम स्वामी ), वास्तव्य निंबरगी. त्यांचे शिष्य १ श्रीलक्ष्मीबाई आक्का २ श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज, ३ श्रीरामचंद्रराव यरगट्टीकर महाराज, वास्तव्य चिमडमठ, व श्रीरामचंद्रराव महाराज यांचे शिष्य ती. तात्यासाहेब.

श्रीक्षेत्र सिद्धगिरी येथील श्रीसद्गुरु काडसिद्ध महाराज-
यांचें देवस्थान.



पिउनि हलहलतें रामनामें निवाले । करुनि वसति सिद्धाद्रीवरी लीन झाले ॥
ह्मणति जन जयातें **काडसिद्धाभिधानी** । प्रणति मम तयाच्या
ज्योतिला मूकवाणी ॥ १ ॥

**रघुनाथ**

श्रीसद्गुरुनाथ नारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर यांची समाधी. निंबरगी.



धन्य **निंबरगी** क्षेत्र भूतळीं, जेथें अवतरले ॥ **गुरुलिंगजंगम** साधु ऐसे, प्रगट जन बोले ॥ १ ॥

**श्रीहनुमंत.**

## पद ३

( चाल—तगत नाहीं तगत नाहीं तगत नाहीं कांहीं. )

धन्य[1] निंबरगी क्षेत्र भूतळीं । जेथें अवतरले ॥
संत-राय श्री तुकाराम ते । तारक जगीं जाहले ॥ ध्रु० ॥
मूळ प्रल्हाद तोचि अंगद । उद्धव पुढें जगतीं ॥
नामदेव मग तुकारामचि । पूर्ण ब्रह्म ज्योती ॥ १ ॥
अवतारीं या नाम नारायण । राव हें धरियेलें ॥
गुरुलिंगजंगम साधू ऐसे । प्रगट जन बोले ॥ २ ॥
सिद्ध गिरीश श्रीकाडसिद्ध । महा मुनिवर पद धरुनी ॥
त्यांचे अनुग्रहें सिद्ध साधन । दावियलें करुनी ॥ ३ ॥
सत्पथ- लोप झाला ऐसा । अनुभव दाखविला ॥
नामरूपाचा लाभ कैसा । मार्ग प्रगट केला ॥ ४ ॥
पतितपावन गुरुपदकमलीं । ठाव निरंतर ॥
दीन होउनी मागतसे हा । दास अष्ट प्रहर ॥ ५ ॥

## पद ४

( चाल—नवल वर्तलें, नवल वर्तलें नवल गुरुचे पायीं. )

रघुनाथप्रिय[2] गुरुवर स्वामी । पूर्ण ज्ञानदाता ॥
दीनपणानें लीन होउनी । शरण आलों आतां ॥ ध्रु० ॥

---

१ या पदांत चिमड सांप्रदायाचे आद्य प्रवर्तक श्रीनारायणराव भाऊसाहेब महाराज निंबरगीकर यांची स्तुती केली आहे, व "कृतयुगामाजी होतों मी प्रल्हाद" या तुकाराम महाराजांच्या अभंगान्वयें प्रल्हाद, अंगद, उद्धव, नामदेव, तुकाराम व तेच श्री. नारायणराव भाऊसाहेब महाराज अशी परंपरा सांगितली आहे.

२ हें पद आपल्या सद्गुरूंचे वडील गुरुबंधु श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचेवर केलें आहे घरचे लक्षाधीशाचे चिरंजीव असून अगदीं बालवयांत सर्व संपत्तीवर लाथ मारून श्रीसाधुमहाराज घराबाहेर पडले व महाभगवद्भक्त झाले. ते श्री समर्थ रामदास स्वामींचे अवतार होत असें या पदांत सुचविलें आहे.

द्रव्य अपार पदरीं असतां । त्याग तुवां केला ॥
मायबापाचा घरदाराचा । मोह नाहीं धरला ॥ १ ॥
अगाध निष्ठा गुरुपदिं धरुनि । साधन त्वां केलें ॥
गुरुकृपेनें अक्षय वैभव । जोडुनि दावियलें ॥ २ ॥
दिगंतरीं तव सत्कीर्तीचा । वाजताहे डंका ॥
ज्ञान-प्रबोधें उद्धरिले जन । राव आणि रंकां ॥ ३ ॥
रामदास श्रीसमर्थ स्वामी । तूंचि सत्य असती ॥
ज्ञानदृष्टिनें पाहतां दासा । ब्रह्मरूप दिससी ॥ ४ ॥

## पद ५

( चाल– सावध सावधान, वाचे बोला नारायण )

[1]विहीर साधुरायाची ।
हरते पाप ताप साची ॥ ध्रु० ॥

गुरुलिंगजंगम-वचनीं ।
गंगा आली तया स्थानीं ॥ १ ॥


रोगग्रस्त जन आले ।
स्नानें रोगमुक्त झाले ॥ २ ॥

विहीरीचें पाणी सुंदर ।
पाट चाले निरंतर ॥ ३ ॥

---

१ चिमड येथील मठांत तापनाशी तीर्थाचे स्थापनेचे वेळीं श्रीरामभाऊ महाराजांनीं एके ठिकाणीं दगडाखालीं पाणी लागेल, तें श्री गंगेचें आहे, त्यास विटाळ होऊं देऊं नये, तें व्याधींचा उपशम करील असें सांगितलें होतें, त्याप्रमाणें तेथें पाणी लागलें. त्यासच हल्लीं तापनाशी तीर्थ म्हणतात. तीर्थाचे मध्यभागीं श्री रघुनाथ प्रिय साधु महाराजांचें मनोहर स्थान आहे. या ठिकाणीं मठ करून राहणें-विषयीं श्रीगुरुलिंगजंगम महाराजांनीं श्री रामभाऊमहाराज यांना पूर्वींच आज्ञा केली होती. सदर तीर्थाचें वर्णन या पदांत केलें आहे.

## श्रीक्षेत्र चिमड येथील श्रीसद्गुरु साधुमहाराज यांचें देवस्थान.



सद्गुरुचें स्थान कवल्यसदन ॥ वैकुंठनिधान प्रत्यक्ष तें ॥१॥
**तापनाशी** तीर्थाची किती वानूं थोरी ॥ न पवेचि सरी भागीरथी ॥२॥

**ती. ह. प. वामनराव कारटणीस.**

मुक्त रत्न माणिकें भरली ।
गुरुच्या हातीं असे किल्ली ॥ ४ ॥
तेजःपुंज नाग डोलतो ।
परि तो भाग्यवंता दिसतो ॥ ५ ॥
अद्वय प्रभा पूर्ण पाही ।
पाहतां दास धन्य होई ॥ ६ ॥

## पद ६

( चाल--विठाबाई माउली )

[1] रघुनाथ—प्रिय गुरुवरा ॥
करी मम वसति हृदयमंदिरा ॥ ध्रु० ॥
भवाब्धिमग्ना पाहुनि मातें ॥
उद्धरि आपुल्या करा ॥ १ ॥
पतितोद्धारक जाणुनि तूंतें ॥
शरण मी तुज गुरुवरा ॥ २ ॥
दीन दास हा निश्चय करितो ॥
तारक तूंचि खरा ॥ ३ ॥

## पद ७

( चाल–अखंड कीर्ती चिन्मय मूर्ती जगतीं अवतरली. )

[2] स्वयंभसदना सुहास्यवदना प्रकटलासि रामा ॥
भवतारक तव पवित्र चरणीं । देई नित्य प्रेमा ॥ ध्रु० ॥

---

१ सदर पद १८९९ सालचे सुमारास कीर्तनाचे आरंभीं नमनादाखल म्हणण्याकरितां केलेलें आहे. या पदांत श्री रघुनाथप्रिय साधुमहाराज यांना उद्देशून नमन केलें आहे.

२ सदर पद आपल्या सद्गुरूवरून केलें आहे. यांत आपले सद्गुरु रामभाऊमहाराज यरगट्टीकर हे श्रीएकनाथमहाराजांचे अवतार असें सांगितलें आहे. श्रीगुरुलिंगजंगम महाराज यांनीं श्रीरामभाऊ-महाराज हे नाथांचे अवतार होत असें पूर्वींच सांगितलें होतें.

वाट धर्माची मोडली साची सोंग अधर्मा चढला ॥
धर्म स्थापना करावयाचा विचार मनीं ठरला ॥ १ ॥
आत्म-स्वरूपा विसरुनिया । मी भवचक्रीं फिरलों ॥
काय सुकृत होतें न कळे ! शरण पदीं आलों ॥ २ ॥
पूर्ण कृपेनें नाम-मंत्र तो । कर्णी फुंकियला ॥
जिकडेतिकडे देव निरंजन । निर्गुण दावियला ॥ ३ ॥
महाविष्णु तूं एकनाथ तूं । स्वामी गुरुनाथा ॥
दास प्रभूचा राम कृपेचा । वंदित पद माथा ॥ ४ ॥

## पद ८

( चाल-रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं. )

[1]हंसावरती राम बैसुनि । चालिले हो पुढती ॥
हंस कसा बघ उड्डाण करितो। खालीं आणि वरती ॥ध्रु०॥
खालीं येतां सवें उडतसे । कोण जाणे गती ॥
प्राणी निजला तरी हंस हा । न सोडी निज स्थिती ॥१॥
हंस गगनिंच्या मुक्ता माळा । देइ आणुनि हातीं ॥
अगणित तारे त्यांत चमकती नाना रंग ज्योती ॥ २ ॥
डोळे झांकुनि जरी पाहसि । स्वरूप दिसे पाही ।
बाप सद्गुरू कृपा करिल। जरी लाभ घडे देहीं ॥ ३ ॥

## पद ९

( चाल--संत दयाळ कसे राजा रंक जया सरसे )

[2]श्रीराम अवतरला ।
जिकडे तिकडे हृष्टींत भरला ॥ ध्रु ॥

---

१ सदर पदांत निर्गुण स्वरूपाचा आत्मानुभव सांगितला आहे. हंसावर बसून येणारा राम, हंसानें आणिलेल्या मोत्याच्या माळा वगैरे अनुभवाच्या गोष्टी ती. तात्यासाहेबांसारख्या गुरुपुत्रांनीच पाहाव्या व जाणाव्या. त्या इतरांस अगम्य होत !

२ या पदांत आध्यात्मिक श्रीरामावतार सांगितला आहे.

दशरथ पाहे वैखरीभीतरी ।
न लभे तेथें कौसल्या-सुंदरी ॥
पाहे मध्यमा माजघरीं ।
परि नच पडे दृष्टीला ॥
तेणें हताश भूपती झाला ॥ १ ॥

पुढती पाहे पश्यंती ओवरी ।
न लभे तेथें ती निर्धारी ॥
चढला परेचिया उपरी ।
तेथें ही अप्राप्य त्याला ॥
तेणें दशरथ बहु खिन्न जाहला ॥ २ ॥

पुढती शोधी तो सहजासनीं ।
जैसी योगिया लागे उन्मनी ॥
पाहतां निवतसे लोचनीं ।
सगर्भ धर्म-पत्नीला ॥
देखोनि आनंद ओसंडला ॥ ३ ॥

जंव जंव तिजकडे सादरें पाहे ।
निज तेज नयनीं नच समाये ॥
पोटा महद्भूत येउनी ठाये ।
विदेही संभवला ॥
तेणें गुणें नृप बहु तुष्ट झाला ॥ ४ ॥

अवलोकितां दाहि दिशा ।
पडला रामरूपीं ठसा ॥
गती खुंटली श्वासोच्छ्वासा ।
माजीं राम कोंदाटला ॥
दासाचा हा कैवारी आला ॥ ५ ॥

## पद १०

( चाल-लगत नाहीं लगत नाहीं लगत नाहीं कांहीं. )

[1]गजवदना तूं सुख-सदना रे । वेगीं मला पावें ॥
मन-मूषकावरी वैसुनि । शीघ्र तुवां यावें ॥ ध्रु० ॥
एक शब्दात्मक माया तीचा । सत्ताधीश असशी ॥
एकदंत हें नाम विराजे । माया-दमन करिसी ॥ १ ॥
विन्मुख होतां तरि तूं सन्मुख साधकासि होसी ॥
वक्रतुंड हें नाम शोभलें । करणी तव ऐसी ॥ २ ॥
अनेक विश्वें तुझिया उदरीं । होति जाति पाही ॥
लंबोदर हें नाम तुजला साजतसे देही ॥ ३ ॥
देहाभिमान मत्त गजाला आकर्षित करिसी ॥
ज्ञान अंकुश तुझिये हातीं । काय वानुं त्यासी ॥ ४ ॥
शूर्प-गुणानें रजोयुक्त तें धान्य रजोहीन ॥
तेवि मायेचा रज जाऊन राहे ब्रह्म-कण ॥ ५ ॥
तव मुख शूर्प कर्णीं लागतां येत असे प्रचिती ॥
शूर्पकर्ण या नामें तुजला । सज्जन वर्णिती ॥ ६ ॥
आत्मा तूंचि ब्रह्महि तूंचि । तूंचि सकळ कर्ता ॥
धर्ता हर्ता तुजविणें । नाहींच उद्धरता ॥ ७ ॥
चित्त दुर्वांकुर आवडे म्हणुनी । अर्पितसे तुजला ॥
स्वानंदाचा मोदक देउनी । उद्धरी दासाला ॥ ८ ॥

## पद ११

( चाल- नवल वर्तलें नवल वर्तलें नवल गुरूचे पायीं. )

[2]भूमि नव्हे तो आप नव्हे तो, तेज नव्हे कांहीं ॥
वायु नव्हे आकाश नव्हे तो, समूह तयाचा नाहीं ॥ ध्रु० ॥

---

१ सदर पद्य कुरुंदवाड मुक्कामीं होणाऱ्या सरकारी गणपत्युत्सवांत केलें आहे.

२ सदर पद्यांत " न भूमिर्न तेजो ', वगैरे श्रीशंकराचार्यांच्या श्लोकानुसार आत्मरूपाचें वर्णन केलें आहे.

इंद्रिय म्हणसी जरी तूं त्यातें, नोहे इंद्रियें दाही ॥
सर्वांविरहित नाशरहित तो, राम असे पाही ॥ १ ॥

ऊर्ध्व नसे तो खालीं नसे तो, आंत बाह्य कांहीं ॥
मध्य भागिं ना बाजु म्हणवेना, मागें पुढें तोही ॥
गगनापरि जो सकळ वस्तुसी, व्यापुनिया राही ॥
सर्वांविरहित नाशरहित तो, राम असे पाही ॥ २ ॥

शुक्ल नसे तो कृष्ण नसे तो, रक्त पीत कांहीं ॥
कुब्ज नसे तो पुष्ट नसे तो, र्‍हस्व दीर्घ कांहीं ॥
रूप असेना वर्ण दिसेना, नांव कांवि साही ॥
सर्वांविरहित नाशरहित तो, राम असे पाही ॥ ३ ॥

माता पिता नसति जयाला, देव लोक कैचे ॥
वेद यज्ञ आणि तीर्थे दिसेना, स्थान मान साचें ॥
निर्विकल्प निर्गुण निष्कल, सूक्ष्म निरंजन लाही ॥
सर्वांविरहित नाशरहित तो, राम दास पाही ॥ ४ ॥

## पद १२

( चाल—सदर. )

सखी सांगते सखी लागुनी काहाणी ही एक ॥
काहणी एकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ ध्रु० ॥

प्रथम काहणी शोधी तारक कोण जगीं आहे ॥
सद्गुरुवांचोनि तारक दुसरा नाहीं निश्चय पाहे ॥
सद्गुरुचा तूं शोध करोनि शरण तया जाये ॥
तन मन धन हें अर्पण करूनि तत्पद जे डावें ॥
बार बार तुज हेंचि सांगणें एक माझी भाक ॥
काहाणी एकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ १ ॥

---

१ या पदांत कहाणीच्या रूपानें मुमुक्षुदशा, सद्गुरूपासून ज्ञानलाभ, साधकावस्था, तींतील अनुभव वगैरे क्रमानें सांगितलें आहे.

दुसरी काहणी ऐक सद्गुरु प्रसन्न जंव होती ॥
नाममंत्र हा तुझिया कर्णीं फुंकुनिया देती ॥
उफराटा हा मंत्र गुरूचा कोण जाणें गती ॥
हरिहरशेषा अंताचि नलगे झाले मुग्धमती ॥
खरें साधन हातीं न येतां शिणती व्यर्थ लोक ॥
काहणी ऐकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ २ ॥

तिसरी काहणी नामस्मरणीं ब्रह्म बिन्दु दिसला ॥
तारक दण्डक कुण्डल अर्ध चंद्र बिन्दु भरला ॥
यजुर्वेद ऋग्वेद अथर्वण साम भेद कळला ॥
तुरे मोहरे वेणु सुस्वरें कर्णीं नाद पडला ॥
शुक्ल कृष्ण निळ रक्त हरित पित रंगा आलें पीक ॥
काहणी ऐकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ ३ ॥

चवथी काहणी काय सांगूं मी अनुभव प्रचीती ॥
हरिहराच्या मूर्तीं पाहे बिन्दु मध्य दिसती ॥
दत्त दिगंबर सिद्ध मुनीश्वर दर्शन तुज देती ॥
पार नसे गे भाग्यासी या कोण करील गणती ॥
स्वानुभवामृत चाखी होऊनी संताची लेक ॥
काहणी ऐकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ ४

पांचवी काहणी पांच भुतांचा देहच हारपला ॥
ज्ञानाचा हा प्रलय पांचवा शब्दचि मावळला ॥
वेद पांचवा स्वर पांचवा हितार्थ हट कळला ॥
गूण पांचवा वर्ण पांचवा कोण जाणे त्याला ॥
रामकृपेविण हनुमंता या नाहिं दुजा शोक ॥
काहणी ऐकतां नाहीं तुला मग जन्ममरणधाक ॥ ५ ॥

## पद १३

( चाल–रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं. )

काय वर्णूं या आत्मस्वरूपा । बोलवेना बाई ॥
जें जें बोलूं तें तया न साजे । उपमा नाहीं कांहीं ॥ ध्रु० ।

दीप म्हणूं जरी तया स्वरूपा । दीप तोहे बाई ॥[1]
तेल वात कांहींच नसतां । दीप कैंवि येई ॥ १ ॥
पुष्प म्हणूं जरी तया स्वरूपा । पुष्प नव्हे बाई ॥
वृक्ष पल्लव नसतां तेथें । पुष्प कैंवि होई ॥ २ ॥
नाग म्हणूं जरी तया स्वरूपा । तोहि नव्हे बाई ॥
नाग मारक असति येथें । तारक हा पाहीं ॥ ३ ॥
सूर्य म्हणूं जरी तया रूपाला । सूर्य नव्हे बाई ॥
मध्यरात्रिसी या भूमंडळीं । सूर्य कैंवि येई ॥ ४ ॥
चंद्र म्हणूं जरी तया रूपाला । तोहि नव्हे बाई ॥
मध्यान्हकाळीं चंद्र दिसला । सांग कोणा पाही ॥ ५ ॥
गुरुपुत्राविण अनुभव वचना । कोण देइ ग्वाही ॥
रामकृपेचा बोध दासासि । धन्य धन्य होई ॥ ६ ॥

## पद १४

( चाल–नवल वर्तलें नवल वर्तलें नवल गुरूचे पायीं. )

कुडी म्हणे तूं आत्मारामा । टाकुनी मजला जाऊं नको ॥[2]
गाठ आमुची बहु जन्मांची । निष्ठुर आतां होऊं नको ॥ ध्रु० ॥

---

१ साधकाच्या दृष्टीपुढें दिसणाऱ्या आत्मरूपाच्या बिंदूला कबीरांनीं दीप म्हटलें आहे. त्यावरच या पदांत वेगवेगळ्या कोट्या लढविल्या आहेत.

२ या पदांत नामदेव कृत " कुडी म्हणे आत्म्याला " या पदाचा अनुवाद आहे.

कुडी बोलली माझी तुझी । प्रीती असे ती बहु भारी ॥
किती काळाची काय सांगूं मी । कोण वाचे ते विस्तारी ॥
धन सुत कांता विषय विलासीं । सुख किती मानिलें
संसारीं ॥
सोडुनी आतां कोठें जासी । परदेशी मी भूमिवरी ॥
स्नेहतंतू हा सदृढ असतां । निर्दयपणें तोडुं नको ॥
गाठ आमुची बहु जन्मांची । निष्ठुर आतां होऊं नको॥१॥

आत्मा बोले संगतीनें तव । घात माझा बहु केला ॥
व्याप जितुका संताप तितुका । सन्निपात गे मज झाला॥
जन्ममरण हा क्षय रोगची । पाठिसी माझ्या लागला ॥
सुख नसे या संसारीं मज । निश्चय माझा दृढ ठरला ॥
संतसंगतीनें मला जाउं दे । प्रेमपाशीं मज गोवूं नको ॥
गाठ आमुची बहु जन्मांची । निष्ठुर आतां होऊं नको॥२॥

कुडी बोलली रावा माझा । चालिला मनमोहन ॥
आतां कोणाकडे पाहूं मी । येथुनी जाहलें हिनदीन ॥
देह सौभाग्य मंदिरावरती । वीज आली कडकडून ॥
काय कुऱ्हाड आकाशाची । कसी वर पडली तुटून ॥
पिंजरा तुझा हा सुंदर पाही । रिकामा आतां पाडुं नको ॥
गाठ आमुची बहु जन्मांची । निष्ठुर आतां होऊं नको॥३॥

वचन ऐकुनी आत्मा बोले । ऐके सादर कुडि बाई ॥
पिंजरा मोडका तूंही मोडकी । धडकें येथें नाहिं कांहीं ॥
काय सोहळा मोडक्याचा गे । मोह तयाचा मज नाहीं ॥
मोह धरूनी आजवरी फसलों । धडका न कळे मज
पाही ॥
धडक्या देवावीण दुसरें । मजला कांहीं नको नको ॥
गाठ आमुची बहु जन्मांची । निष्ठुर आतां होऊं नको॥४॥

कुडी बोलली सांगा कोठें । जानवसा हो मला दिला ॥
जातां तुम्ही कोठें तरी । ठावकि सांगा तसा मला ॥

येरु बोलला मसणपुरीं । तुज ठाव जाण गे नेमियला ॥
मुक्तिपुरीमध्यें जाणें मजला । सौख्यसिंधू झणिं भरला ॥
दास विनवितो रामकृपेविण । मजला कांहीं नको नको ॥
गाठ आमुची बहु जन्माची । निष्ठुर आतां होऊं नको॥५॥

## पद १५

( चाल--संत दयाळ कसे, राजारंक जया सरसे )

[1]संसार-वृक्ष हा पाही । अच्छेद्य कैसा होउनि राही ॥ध्रु० ॥
आदि मध्य आणि त्या अंतकाळीं । जन्म मरण फळें
ज्या आलीं ॥ १ ॥
भ्रम मदाचीं सुख शोकाचीं । पानें दिसती त्या
वृक्षाचीं ॥ २ ॥
पाहतां त्याचें मूळ कर्माचें । बहु खोल आहे सांगतों
साचें ॥ ३ ॥
कामक्रोधादि रिपु अनिवार । शाखा विस्तारल्या
थोर ॥ ४ ॥
त्यावरि बसलीं बघ पक्षि-कुळें । सुत पशु वनिता
कन्येचे मेळे ॥ ५ ॥
असंग शस्त्राविण छेद्य नाहीं । ऐसें सज्जन देती रे
ग्वाही ॥ ६ ॥
छेदुनि वृक्षा पद्मती होई । दास म्हणे नाम हरिचें
गाई ॥ ७ ॥

## पद १६

अंजनीगीत.

[2]शुचिर्भूत शुद्ध मती । ईश्वर भाव सर्वांभूती ॥
तोचि सदा वसे तीर्थीं । तीर्थें त्या संगें ॥ १ ॥

---

१ या पदांत भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायांतील "अश्वत्थमेनं सुविरूढ मूलं" या श्लोकाचा अनुवाद आहे.

२ मोठमोठ्या यात्रा करून कामक्रोधादि मनोविकार तसेच परत घेऊन येणाऱ्यांना या पदांत पुष्कळ बोध मिळण्यासारखा आहे.

काम क्रोध लोभ त्रया । स्पर्श न करी ज्याची काया ॥
तोचि तीर्थवासी राया । तीर्थ त्या वंदी ॥ २ ॥

विष्णुस्मरण शिवस्मरण । दोघीं वसविले ज्याचे प्राण ॥
तोचि तीर्थवासी जाण । तीर्थ चरण वंदी ॥ ३ ॥

इंद्रियनियमाचिये व्यसनीं । सत्य मधुर ज्याची वाणी ॥
अहंकार ज्याचे मनीं । कदा न संचरे ॥ ४ ॥

सकळ तीर्थांचा तोचि धात्रा । तीर्थें करिती त्याची यात्रा ॥
तत्पादोदकीं तीर्थें सत्रा । माथा ओढवती ॥ ५ ॥

तीर्थीं असोनि इच्छारहित । प्रतिग्रहातें न घाली हात ॥
यथालाभें संतोषत । तीर्थरूप तोचि ॥ ६ ॥

परद्रव्या अंध नयनीं । परस्त्री पहातां क्लीबत्व मनीं ॥
परापवादीं मूकत्व वदनीं । तीर्थ जनक तोचि ॥ ७ ॥

मन इंद्रियें निग्रह करी । गृहीं असोनि जान्हवी-तीरीं ॥
तीर्थीं असोनि अनाचारी । कीटक वासि तो ॥ ८ ॥

योगी आत्मज्ञानी तीर्थीं । आत्मरूप स्वयंज्योती ॥
भक्त श्रवणादि नव ही तिर्थीं । होती दास हरि-रूप ॥९॥

## पद १७

अंजनीगीत.

कीर्तनगुणें होत सप्रेम । प्रेमरंगीं मेघश्याम ॥
मेघश्यामा ठाईं विश्राम । पावती ते संत ॥ १ ॥

---

१ दोन तपांवर कोणांकडून एक पैही न घेतां नित्य कीर्तन-भक्तीनें ईश्वरोपासना करण्यांत ज्यांनीं आपले आयुष्याचें सार्थक केलें त्यांनाच अशा प्रकारच्या अनुभवाचा आस्वाद घेतां येईल. इतरांस तो मिळणें अशक्य होय.

संत तेथें पूर्ण ज्ञान । ज्ञान तेथें आनंदघन ॥
आनंद तेथें समाधान । समाधानीं सुख ॥ २ ॥

सुख तेथें असे समाधी । समाधि तेथें तुटली आधी ॥
आधि तुटल्या जीव उपाधी । नुरेचि शोधितां ॥ ३ ॥

उपाधि तुटतां होत अभेद । अभेद तेथें पूर्ण बोध ॥
बोध तेथें ब्रह्मानंद । ठसावे परिपूर्ण ॥ ४ ॥

ऐसा कीर्तनाचा महिमा । जाहली बोलायाची सीमा ॥
रामकृपेनें परमात्मा । जोडला दासाला ॥ ५ ॥

## पद १८

( चाल-उद्धवा शांतवन कर जा, त्या गोकुळवासि जनांचें )

[1]स्थिर स्थीर होई मनुबाई । हरिकीर्तनीं सावध होई॥ध्रु०॥

काय सांगूं तुझ्या संगतिनें । नर जन्मा आणिलें उणें ॥
एक विषय सेवन करणें । या परतें कांहींच नेणें ॥
परमार्थ विषापरी वाटे । चौमुक्ती जोडती जेणें ॥
॥ चाल ॥ पुरे तुझें नाचणें आतां । किती गाजविसी मजवरी सत्ता ॥
साधि साधि कांहीं परमार्था । हरिनामीं स्वस्थचि राही ॥ १ ॥

कीर्तन संत रायाचें । परमार्थ तत्वबोधाचें ॥
सांगणें बहुत प्रेमाचें । प्रासादिक गुरुभक्तीचें ॥
आदरें ऐकती साचे । धन्य भाग्य त्या लोकांचें ॥
॥ चाल ॥ देव कीर्तनांत प्रगटला । जेथें तेथें पाहतां भरला ॥
असा अनुभव कोठें न आला । तनु पुलकित जेथें होई ॥ २ ॥

---

१ या पदांतही नित्य कीर्तनांत प्राप्त होणाऱ्या जीव, शीव आणि मन या त्रिकूटाच्या ऐक्यानुभवाचें वर्णन केलें आहे.

हरिकथा गोड बहु झाली । वाचे न बोलवे बोली ॥
भाग्यवंत मंडळी बसली । असी शोभा कोठें न दिसली ॥
स्वारी सद्गुरुची आली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ॥
॥ चाल ॥ जीउबाई कीर्तना आली । शिउबाई तिजासि भेटली ॥
मनुबाई निवांत ठेली । दासा प्राप्त झाली गुरुपायीं ॥ ३ ॥

## पद १९

( चाल—जाऊं कामाला गडे ग दिवस किती आला. )

बसूं या साधनाला । गडे ग काळ व्यर्थ गेला ॥ ध्रु० ॥
सद्गुरुपायीं चित्त ठेवुनी । त्यांच्या वचनाला ॥
मनीं दृढ धरुनी साधन करुं या । नामस्मरणाला ॥ १ ॥
नामस्मरणाविण साधन । नाहीं नाहीं तुजला ॥
सद्गुरुचा हा बोध असा गे । पाळी नित्य त्याला ॥ २ ॥
प्रथमारंभीं ब्रह्मबिंदु तो । दृष्टीपुढें दिसला ॥
बिंदु पाहतां तयापासुनी । सिंधु पुढें जाहला ॥ ३ ॥
नानापरिची स्वरूप संपदा । कोण वर्णी त्याला ॥
रामकृपेनें दीन दासाला । अनुभव हा आला ॥ ४ ॥

## पद २०

( चाल—चला बाई वृंदावनीं रासक्रीडा पाहूं )

चला बाई गुरुपायीं रम्य मुरली वाजे ।
अनुहात वेणू तिचा नाद श्रवणीं गाजे ॥ ध्रु० ॥
सप्त स्वरीं खुण तिची मंजुळ ती ध्वनी ।
अकल्पीत गुरुकृपें पडली माझे कानीं ॥ १ ॥
तनु मन धन सद्गुरुसी आवडीनें वाहूं ।
मुरली ऐकुनि याच देहीं मुक्त होउनी जावूं ॥ २

मन मुरली नाम मिळुनी वाजे किती गोड ।
गोड गोड गोड बाई पुरवी मनिंचें कोड ॥ ३ ॥

चित्त मयूर पंख पसरुनी पहा केवीं नाचे ।
नवल मोठें जोडलेंसे भाग्य दासा साचें ॥ ४ ॥

## पद २१

( चाल--संत दयाळ कसे, राजा रंक जया सरसे )

अद्वय ब्रह्म तूं पाहीं । तेंचि स्वयें होउनि राही ॥ ध्रु० ॥
जयाहूनि हा लाभ न दुसरा । ज्याहुनि सुख श्रेष्ठ नाहीं ॥
ज्यातें पाहतां पाहणें दुसरें । सांग तूं मजला उरलें
काई ॥ १ ॥
ज्या ज्या परतें रे सत्य ज्ञान । कोणतें मिळविसी देहीं ॥
जी वस्तु स्वयें आपणचि होतां । पुनर्भव या जगतीं
नाहीं ॥ २ ॥
निर्गुण निष्कल सूक्ष्म निरंजन । वदती अठरा चारी
साही ॥
सद्गुरुकृपामुद्रित दास हा । वस्तू ऐशी प्रगटचि
लाही[२] ॥ ३ ॥

## पद २२

( चाल--तगत नाहीं तगत नाहीं तगत नाहीं कांहीं )

स्वरूप निर्मळ आहे निघोट । सर्वांहूनि मोठें ॥
विन्मुख होतां सन्मुख होतें । सकळ ज्यांत आटे ॥ ध्रु० ॥
स्वरूप वाटे दूर परी तें । जवळ अंतरीं ॥
दूर जवळी म्हणवेना । खुंटे वैखरी ॥ १ ॥

---

१ अठरा पुराणें, चार वेद व सहा शास्त्रें. २ या पदांत श्रीशंकराचार्यांच्या “ यल्लाभान्नापरो लाभो ” या श्लोकाचा अनुवाद केला आहे.

सकळांहूनि मृदु कोवळें । स्वानुभवें कळतें ॥
शस्त्राचेनि छेद असेना । अछेद्य ऐसें तें ॥ २ ॥

अग्नी ज्याला जाळुं शकेना । अदाह्य त्या म्हणती ॥
महाप्रळयिंचे जळीं बुडेना । अक्लेद्य ते वदती ॥ ३ ॥

महाप्रभंजन उडवुं शकेना । शुष्क न तें होई ॥
अशोष्य ऐसें नाम तयातें । देति चार साही ॥ ४ ॥

रोड असेना स्थूळ असेना । खुंजट उंच नाहीं ॥
वर्तुळ नव्हे सरळ लांब । वाचे बोलूं कांहीं ॥ ५ ॥
बाळ असेना तरुण दिसेना । नव्हेचि म्हातारा ॥
परमात्मा हा काय वानुं मी । ऐक ज्ञानचतुरा ॥ ६ ॥
श्वेत सावळा रक्त पिवळा । हरित नीळ रंग ॥
नवरंगाची गर्दी दाटली । परम अव्यंग ॥ ७ ॥

हालेना जें चालेना जें । बोलेना ना डोले ॥
गगनापरि जें व्यापुनि सर्वां । भरूनिया उरलें ॥ ८ ॥
जयास कोणी नेईना तें । चोरा चोरवेना ॥
अणूमात्र तें लक्षवेना । कल्पांतीं वेचेना ॥ ९ ॥
ऐसें जरी न बोलावें तरि । सांग काय करावें ॥
न बोलतां तुज कसें कळावें । दासा सांगुन द्यावें ॥ १० ॥

## पद २३

( चाल—रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं )

सद्गुरुवचनें ब्रह्म जन्म हा[१] । मायाजठरींहुनी ॥
काढी वेगळे मजलागूनी । अगाध ही करणी ॥ ध्रु० ॥

---

१ श्रुतीवचनांप्रमाणें प्रत्येक प्राणी जन्मतः शूद्र असतो उपनयनसंस्कारानें ब्राह्मण होतो. हाच संस्कार दुसरा जन्म मानला आहे व त्याचेंच वर्णन या पदांत केलें आहे.

शांती क्षमा दया कामिनी येती । माझे जन्मकाळीं ॥
अनुहात ध्वनि झेंगट पिटिले । बोलती वेल्हाळी ॥ १ ॥
बहु भाग्याचें मूल जन्मलें । आपरूपलक्षणी ॥
सोहंपणानें कैसें पाहतें । बाळक हें नयनीं ॥ २ ॥
पायाळ हें मूल जन्मलें । पाहे गुप्त ठेवा ॥
अविद्येचें दुःख हरपलें । लाभ मोठा जीवा ॥ ३ ॥
चिद्रत्नांच्या अंजुळी धरूनी । बाप माझा आला ॥
मधु लावितो स्वानंदाचा । मुखासि निज लीला ॥ ४ ॥
कल्पना ही रात्र सटविची । निरसली बघ कैसी ॥
ज्ञान दीप लावुनी ब्रह्म । स्वरूप प्रकाशी ॥ ५ ॥
निरालंबिच्या पालखांत । निज निज रे म्हणती ॥
परिये देति श्रीगुरुनामें । हल्लर पै गाती ॥ ६ ॥
अनेक जन्में फिरुनियां तूं । भागलासी बाळा ॥
निज स्वरूपीं ऐक्य होय तूं । बोलती दासाला ॥ ७ ॥

## पद २४

( चाल--रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं )

हरिहर मूर्ति एकचि असतां । भेद जे मानिती ॥
कोण गती त्या होइल ऐका । पुराणें बोलती ॥ ध्रु० ॥
सौर पुराणींची वाणी । विष्णुभक्त निंदी ॥
शंकरातें तयासि आश्रय । न मिळे गोविंदीं ॥ १ ॥
नारदपुराणींची वाणी । शंकर हरिरूपी ॥
लिंगरूप हरि भेद मानितां । नरका जाय पापी ॥ २ ॥
स्कंद पुराणींची वाणी । वैष्णव शिवद्रोही ॥
शिवभक्त जो हरिचा द्रोही । वास त्या रौरवीं ॥ ३ ॥
भविष्यपुराणीं व्यास बोलिले । शंकर हरिमाजीं ॥
भेद मानितां भ्रूणहत्या । घडत तया सहजीं ॥ ४ ॥

एक श्रेष्ठ एक अश्रेष्ठ । मानिती जे जनीं ॥
पिशाच राक्षस होती ऐसें । वायुपुराणीं ॥ ५ ॥

संत सज्जन तेचि बोलिले । हरिहर एक रूप ॥
समज दृढ मनीं दास विनविती । होइ तूं निष्पाप ॥ ६ ॥

## अभंग २५

सांगा तुम्ही ब्राह्मण । देव कोणें ठायीं ॥
देव ठावा नसतां । ब्राह्मणत्व नाहीं ॥ १ ॥
सांगा हो संन्यासी । नारायण कोणे ठायीं ॥
नारायणावीणें । यतिधर्म नाहीं ॥ २ ॥
सांगा जंगम आत्मलिंग कोणें ठायीं ॥
आत्मलिंगावीण जंगमपण नाहीं ॥ ३ ॥
शेवड्या निरंजन पेठ कोणे ठायीं ॥
पेठ न जाणतां शेवडाचि नाहीं ॥ ४ ॥
सांगा काजी तुमचा अल्ला कोणे ठायीं ॥
अल्ला ठावा नसतां काजीपण नाहीं ॥ ५ ॥
दास म्हणे राम तुझा कोणे ठायीं ॥
राम न जाणतां आरामचि नाहीं ॥ ६ ॥

## पद २६

अंजनीगीत.

[1]कोणाचा देव मागे लाखोली । कोणाचा मागे बेल मोटाळी ॥
कोणाचा मागे दिवटी बुधली । तुळसीपत्र एक ॥ १ ॥

---

१ सकाम उपासक, सकाम उपास्य व सकाम उपासना हीं तिन्हीही परमार्थप्राप्तीला निरुपयोगी आहेत असें या पदांत सुचविलें आहे.

कोणाचा मागे गोंधळ घाली । कोणाचा मागे रोडगे पोळी ॥
कोणाचा मागे हरळी डाहळी । पेंड्या दुर्वांच्या ॥ २ ॥
कोणाचा म्हणे लाव गळतीला । कोणाचा लग्न करा तुळशीला ॥
कोणाचा म्हणे पिंपळाला । पार त्वरें घाली ॥ ३ ॥
कोणाचा म्हणे कर यात्रेतें । कोणाचा म्हणे करी व्रतातें ॥
कोणाचा म्हणे देवपूजेतें । करीत जावें नेमें ॥ ४ ॥
माझा देव कांहीं मागेना । मीही त्यासी कांहीं देईना ॥
दोनीकडे सारखा जाणा । घडला संबंध ॥ ५ ॥
देव फुकाचा कांहीं मागेना । मी ही फुकटच्या देईना ॥
फुकट व्यवहार हा जाणा । आमुचा देवाचा ॥ ६ ॥
चुकलों तरि मी देव रुसेना । न देइ देव रागेजेना ॥
देवा आवडी एकचि जाणा । नामस्मरणाची ॥ ७ ॥
सांडोनियां सकाम कोण । फुकाचा धरितो देव ॥
दास कपाळीं होता पहा हो । गुरुकृपें जडला ॥ ८ ॥

## पद २७

( चाल--बसूं या साधनाला गडे ग काळ व्यर्थ गेला )

घडघडाट रथ चाले । तेणें तिमिरदळ हाले ॥ ध्रु० ॥
चरणरहित उन्मन सारथी । अरुण नाम ज्याला ॥
पंचतत्वाचा स्यंदन त्यासी । जोडे अश्वाला ॥ १ ॥
जय अजय विजय जित । प्राण जित श्रम ॥
जित क्रोध तो मनोजय । सप्ताश्व प्रसिद्ध ॥ २ ॥
मन देह महा असुर ते । रोधिती मार्गातें ॥
हरिनामाचे अर्घ्यप्रदानें । विनाश विघ्नातें ॥ ३ ॥
रत्न प्रभामय तेजोमंडल । अदृश्य जगताला ॥
योगपथानें सूक्ष्म मार्गानें । पाहतां दृश्य त्याला ॥ ४ ॥

ज्ञानघन जे अति गूढ जे । दुःखक्षयकारी ॥
सिद्ध चारण गाति मंडल । त्रिविधतापहारी ॥ ५ ॥
जया मंडला पाहती स्तविती । एक ब्रह्मविद ॥
निरालंब या मार्गें चाले । अनुभव प्रसिद्ध ॥ ६ ॥
चिदाकाशिंचा सूर्य जयाला । उदय अस्त नाहीं ॥
रामकृपेनें ज्ञानदृष्टिनें । दास त्यास पाही ॥ ७ ॥

## पद २८

( चाल--अरे मानवा भज राघवा किती वैभवा भुलशील बा. )

हरिनामाची वाहि रे कावड ती । कावड ती तुज नावडती
जरि आवडती भव सावडती ॥ ध्रु० ॥
हरिनामाचा होई कापडी रे । कापडीरे तडी तापडी रे
डोळा झापडी रे झाली बापुडी रे ॥ १ ॥
पंचमालापी नाम कोकिले ग । गाई कोकिले गे माणिक
झाकिलें ग
व्यर्थ टाकलें ग । नाहीं ऐकलें ग ॥ २ ॥
कावडींत गुरुनाम भरलें ग । नाम भरलें ग दृढ ठरलें ग
पाप सरलें ग दुःख हरलें ग ॥ ३ ॥
गुरुनाम दासानें गाइलें ग । नाम गाइलें ग नाम ते गाइलें ग
नाम गाइलें गे । मनीं ध्याइलें ग रूप पाहिलें गे
प्राण वाहिले गे ॥ ४ ॥

## पद २९

( चाल—फटका ).

येवढें[1] कोडें उकलुनी दावी । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
न कळे तरी सद्गुरुपायीं । शरण जाउनि पुसूनि घे ॥ ध्रु० ॥

---

१ नामदेव तुकाराम आदि करून साधुसंतांचीं प्रसिद्ध कोडीं आहेत तसलेंच हेंही कोडें आहे. त्याचा अर्थ गुरुपुत्रांशिवाय दुसऱ्यांस कळणें शक्य नाहीं

वायुचि मोट कशानें बांधिली । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
वाळूची वेटी थोटय़ानें विणली । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
मुंगीनें पृथ्वी माथां रे धरली । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
वांझेच्या पोरांचीं लग्नें रे झालीं । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥ १ ॥

सशानें सिंह कसा रे फाडला । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
गाईनें व्याघ्र फाडूनि खाल्ला । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
चंद्रासि ताप कैसा रे झोंबला । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
बेडकानें पाही भुजंग गिळिला । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥ २ ॥

तोंडाळ प्राणी मुकेची जाहले । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
डोळयानें गगनांत टाकें रे फोडलें । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥
वळचणीचें पाणी आढयाला गेलें । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥
पांगुळ पर्वतमाथा रे चढलें । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥ ३ ॥

मोत्याचा सागर डोळयांत भरला । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥
चांदण्याचा गोंधळ दृष्टींत जडला । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥
अभ्रावीण पाऊस कसा रे पडला । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥
पाऊस पडे परि चिखल न झाला । अर्थ तयाचा
सांगुनि दे ॥ ४ ॥

सूर्याविण प्रभा कोवि उजेडे । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥
चंद्रोदयाविण चांदणें पडे । अर्थ तयाचा सांगुनि दे ॥

अंधारीं दिसती माणिकाचे खडे। अर्थ तयाचा सांगुनि दे॥
हनुमंतहृदयीं राम रत्न जडे। अर्थ तयाचा
सांगुनि दे॥ . ॥

## पद ३०

( चाल--जो जो म्हणतसे माया, साकारातीत निजरे चांगया )

जववरीं सद्गुरु प्रसन्न नाहीं। मातिची महती न
कळे ग बाई॥ ध्रु० ॥
मातींत माणीक चमकत पाही। माणिक न
कळतां व्यर्थ जन्म बाई॥ १ ॥
मातींत हिरे लखलखती पाहीं। हिरे न कळतां व्यर्थ
जन्म बाई॥ २ ॥
मातींत मोतीं झळकती पाहीं। मोतीं न कळतां व्यर्थ
जन्म बाई॥ ३ ॥
मातींत मोहनमाळ गे पाहीं। माळ न कळतां व्यर्थ
जन्म बाई॥ ४ ॥
मातींत चांदणी झमकत पाहीं। चांदणी न कळतां व्यर्थ
जन्म बाई॥ ५ ॥
गुरुनाम स्कंधीं वाहुनि पाहीं। हनुमंत मातींत नाचतो
बाई॥ ६ ॥

## पद ३१

( चाल—रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं )

नारद बोलत रावण परिसत। बोध तो अवधारा॥
॥ प्राणिया ॥
राम मिळे तुज निशाचराला। तत्वज्ञान सारा॥ ध्रु० ॥
नाना चिंतेचे प्रबळ अनर्थ। उठती या देहीं॥
चित्त विसरेना भगवंतातें। तच्चित्त तूं होई॥ १ ॥

उत्तम मध्यम अधमा भूतीं । रामाचि भाविजे ॥
तिनी अवस्थेमाजी त्याचा । भक्ताचि होईजे ॥ २ ॥

प्रपंचसाधन सांडुनि काया । अर्पी त्या प्रभुला ॥
तद्गतप्राण हो श्वासोच्छ्वासीं । सेवुनि रामाला ॥ ३ ॥

सोहं हंसाचया अनुवृत्ती । प्राण वृत्ति चाले ॥
योगस्थिती ही परम गुह्याचि । वेदशास्त्र बोले ॥ ४ ॥

देहीं देहाचें स्फुरण असेना । वेदमार्ग कर्म ॥
आत्माभिमान नुठे तयाचें । परायणीं वर्म ॥ ५ ॥

ऐशा रीती अनन्य भजनें । राम भेटे तुजला ॥
रामायणिंची गोड कथा ही । आवडे दासाला ॥ ६ ॥

## पद ३२

अंजनीगीत.

मारुति पुसे श्रीरामासी । सीता ओळखावी कैसी ॥
सांगे स्वामी निज कृपेसी । खूण रघुनाथा ॥ ध्रु० ॥

राम बोलिला हे हनुमंता । बरवें पुसिलें भाग्यवंता ।
सीतासतिची खूण वार्ता । सांगतसे तुजला ॥ १ ॥

श्रवणीं राम नयनीं राम । वाचे नित्य वसवी राम ।
ध्यानीं राम मनीं राम । रामानुसंधानीं ॥ २ ॥

जेथें सीतेची वस्ती घडे । राम राम स्मरती झाडें ॥
पशु पक्षी पाषाण खडे । राम स्मरती ते ॥ ३ ॥

सीतासतिची निज धरा । नित्य स्मरे रामचंद्रा ॥
अंग-स्पर्शाचा जो वारा । रघुवीर स्मरताहे ॥ ४ ॥

प्राणाच्या रे निजसंसारीं । विसंबेना राम सुंदरी
सकळ इंद्रियें निर्विकारी । अधिकारी श्रीरामें ॥ ५ ॥

निज कृपें रघुनाथ । ठेवुनी माथां वरद हस्त ॥
नाम मुद्रा स्वयें देत । दास हनुमंता ॥ ६ ॥

## पद ३३

( चाल—रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं. )

राम सिंहासनीं बैसोनियां । पुसती हनुमंता ॥
प्रसन्न आहे इच्छित तुझें । कांहीं माग आतां ॥ ध्रु० ॥

पवनतनय तो विनवी रामा । प्रसाद हा द्यावा ॥
पृथ्वीवरती रामकथा जंव । दास हा वांचावा ॥ १ ॥

राम बोलिला तथास्तु इच्छित । काय आहे दुजें ॥
येरु वदतसे जेथें कथा तव । अधिष्ठान माझें ॥ २ ॥

राम बोलिला तथास्तु ऐसें । माग कांहीं तिजें ॥
उत्तम मध्यम अधमांनींही । नामस्मरण कीजे ॥ ३ ॥

राम बोलिला तथास्तु ऐसें । आणखी माग कांहीं ॥
दुष्ट जनाची दुर्वृत्ति जाउनि । नामीं भक्ति देईं ॥ ४ ॥

प्रभुवरपायीं हनुमंताची । याचना पहा कैसी ॥
त्याचे वचना मान देउनि । चालवी स्मरणासी ॥ ५ ॥

रामायणिंची गोड कथा ही । परिसे गुणवंता ॥
रामकृपेचें महद्भाग्य हें । आलें दास-हाता ॥ ६ ॥

## पद ३४

( चाल—रंग माजला रंग माजला रंग गुरुद्वारीं. )

रुक्मिणीनें जी लिहिली पत्रिका । आवडिनें ऐका ॥
लग्नपत्रिका कोण म्हणे त्या । महाबोध निका ॥ ध्रु० ॥

मनोवेगाचा वारु केला । द्विजवर त्यावरती ॥
शीघ्र गतीनें धाडियेला तिनें । जेथें कृष्ण-वस्ती ॥ १ ॥

रम्य नगरी त्या द्वारकेमाजीं । दोन अक्षरी नाणें ॥
जैसें देणें तैसें घेणें । नाहीं कोणा उणें ॥ २ ॥

१ या पदांत रुक्मिणीस्वयंवरावर आध्यात्मिक वर्णन केलें आहे.

नमन श्रीहरी चरणीं तूं मज । निर्विकार नवरा ॥
नेई मंदिरा आपुल्या मर्दुनी । काम क्रोध असुरा ॥ ३ ॥
पांच विषय जणु बंधू त्यांनीं । निश्चय हा केला ॥
सिंहाचा तव भाग हा द्यावा । जंबुक शिशुपाला ॥ ४ ॥
ज्ञानवंत जो विदर्भ राजा । कोण पुसे त्याला ॥
शुद्धमती ती माता तिचा । उपाय तो थकला ॥ ५ ॥
ऐक माधवा प्राण हा माझा । नामीं तुझ्या जडला ॥
अन्नपान तें कांहीं रुचेना । जीव विषया विटला ॥ ६ ॥
करुणा तिची ऐकुनि श्रीहरी । अंतरीं गडबडला ॥
निर्वाणीं तिज पावुनि सदये । उद्धरी दासाला ॥ ७ ॥

## पद ३५

( चाल--मित्रा मम जन्म कथा )

कृष्ण वदे कुंति'सुता ऐक अर्जुना । नामाविण करिसी
काय अन्य साधना ॥ ध्रु० ॥
नाम माझें सोडुनिया-कर्में करिसी । सुख तेणें नाहीं
तुज कर्मबंध पावसी ॥ १ ॥
कर्मत्याग करुनि नाम स्मरसी तूं जरी । कर्म तुझें
मत्प्रिय ऋषी करिती भूवरि ॥ २ ॥
नामयुक्त प्राणी मला-प्रिय बहु असे ॥ कर्मयुक्त मनुज
तसा प्रिय मला नसे ॥ ३ ॥
चित्त निश्चल करुनी दास । गाती नाम जे ॥ सर्वांठायीं
मीच त्यांसी-नाहीं त्या दुजें ॥ ४ ॥

## पद ३६

( चाल— मित्रा मम जन्म कथा० )

भीष्म वदे धर्म नृपा ऐक भारता ॥ वासुदेव आहे
कसा सांगतों आतां ॥ ध्रु० ॥

नक्षत्राचि आकृति असे, इंद्रहूनि शुद्ध दिसे, ॥
इंद्रनीळ मणिच भासे, । ऐक तत्वतां ॥ १ ॥
वज्र वैडुर्याची सरी, सर्वां ठाईं चराचरिं, ॥
मोतियाचे माळेपरी, दिसतो सर्वथा ॥ २ ॥
शुकपत्र-नीभ वर्ण, सोन्याहुनी पीत जाण, ॥
रक्त प्रवाळ परिस पूर्ण, रूपें भासता ॥ ३ ॥
अग्निसंगें जळत नाहीं, पाण्यामाजिं बुडत नाहीं, ॥
वायुसंगें उडत नाहीं, ऐक नृपसुता. ॥ ४ ॥
सद्गुरुकृपा नवलाई दास म्हणे सांगु काई ॥
वासुदेव नित्य पाहि, दृष्टिपूढता ॥ ५ ॥

## पद ३७

( चाल—प्राण्या राम भजावा रे मूर्खा गर्व नसावा रे )

[1]सद्गुरुराज पहा प्राण्या। मग तूं मुक्त होसी शहाण्या ॥ ध्रु० ।
त्रिकूट शिखरावरती पाहे वस्ती ज्यांची आहे ॥
इडा पिंगला सुषुम्नेच्या संगमीं वसताहे ॥ १ ॥
पाहतां मन हें तल्लिन जाहलें दिसते मौक्तिक-माला ॥
गगनाहूनी कोसळताती नक्षत्रांच्या माला ॥ २ ॥
रघुनाथप्रिय गुरुवर स्वामी यांचा प्रसाद घ्यावा ॥
आत्माराम सर्वांठायीं नेत्रांतरीं पाहावा ॥ ३ ॥

## पद ३८

( चाल--हर हर विठ्ठल जगदोद्धार. )

देवा पुरे पुरे गर्भवास । सोडवि यांतुनिया ॥ ध्रु० ॥
नाना याती जन्म पावुनी । तेथिल दुग्ध आहार सेवुनि ॥
नाना दुःखाची हो जाचणी । चिळस मनीं वाटतसे ॥ १ ॥
मातेचिया उदरकुहरीं । मूत्र-नरकाचे कोठारीं ॥
कृमी जंतू नाक मुखांतरीं । रिघती हरी किती दुःख ॥ २ ॥

---

१ हें पद "कैवल्यवैभव" पुस्तकांत छापुन निघालें आहे.

निज कृपेनें ऐक दयाळा। काढिसी श्रीहरी यांतुनि मजला ॥
शरण जाउनी गुरुपद्कंमला। निज मुक्तीला
जोडिन मी ॥ ३ ॥
नाना परिची कोविलवाणी। विनवीतसे मोक्षदानी ॥
जन्म पावतां विसरोनी। गेला भ्रमुनी दास म्हणे ॥ ४ ॥

## पद ३९

( चाल—नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग )

नाऊ धन्य, निऊ धन्य, धन्य धन्य आगिदेऊ ॥
धन्य आगीदेऊ शीव स्वयंभु लिंग नोडी ॥ ध्रु० ॥
केळे निऊ केळे रथ्या संतोष धिंद इरबेकू ॥
राममंत्र सुवे जपी धन्य धन्य आगबेकू ॥ १ ॥
सहस्र जन्म गळुव्हाडु जिव शीव भेयादि इल्ला ॥
गुरुकृपा करुणेयु ऐक्यरूप आगिद्देऊ ॥ २ ॥
गुरुलिंगजंगम दोड्डु क्षेत्र निंबरगी ॥
गुरुचरणकमलदल्ली भृंग राम आगिद्दा ॥ ३ ॥
रामचरण हउगनोडी लिना गिद्दा हनुमंत ॥
आ चरण कमलदल्ली नी स्थिर आगुवेगे ॥ ४ ॥

---

जनीं रामसेवा मनीं रामसेवा ॥ तया रामनामीं जयाला विसांवा ॥
हनूमंत हें नाम साजे जयाला ॥ नमस्कार साष्टांग माझा तयाला ॥१॥

रघुनाथ कोटनीस.

# कैवल्यकुसुम.

## प्रकरण २ रें.

### श्लोक १

**श्रीसद्गुरुरामनिर्याण.**

वसंत–तिलक.

श्रीराम सद्गुरु कृपाघन पूर्णसिंधू ॥
भक्तांतरंगपरिपूरित दीन–बंधू ॥
वेगें मनांत निजधाम-प्रयाण योजी ॥
सांगे आकासि निज हेतु पुढील काजी ॥ १ ॥


आका वदे झडकरी मम रामराया ॥
इच्छा प्रयाणविषयीं नचही धरा या ॥
नानानुवाद करि निश्चय तोडवेना ॥
श्रीरामवाक्य पुढती खलु मोडवेना ॥ २ ॥

एकांत वाक्य कवणा नच जाणवीलें ॥
शीघ्र प्रयाण-विधिचे क्रम चालवीले ॥
शिष्यासि साधन धनास्तव राहवीलें ॥
चोरामिषें निशिदिनीं बहु जागवीलें ॥ ३ ॥

---

श्री भाऊसाहेब महाराज निंबरगीकर (गुरुलिंग-जंगमस्वामी) यांची मानिलेली कन्या. श्रीरामभाऊमहाराज यांची ज्येष्ठ गुरुभगिनी. गुरुलिंग-जंगममहाराजांच्या पश्चात् या चिमड येथील मठांत रहात असत. श्रीरामभाऊ महाराज यांचे आज्ञेंत असत.

श्रीक्षेत्र चिमड येथील श्रीसद्गुरु दाजिसाहेब महाराज, श्रीरामचंद्रराव महाराज यरगट्टीकर व श्रीलक्ष्मीबाई आक्कासाहेब महाराज या त्रैमूर्तींची समाधी.



**श्रीराम** प्रभु वसला सपुत्र जेथें ॥ **लक्ष्मी**ही करि वसती अवश्य तेथें ॥
ही एका शिवतरुची त्रिरूप-सिद्धि ॥ भोगीते **चिमड**मठांत चित्समाधि ॥ १ ॥ **साधुदास.**

मालिनी.

उपनयन[1]विधी तो शीघ्र नारायणाचा ॥
[2]तदनु सुतविवाहारंभ योजीत साचा ॥
बहुत लगबगीनें कार्य संपूर्ण केलें ॥
निज भुवन वराया प्राण वाटे भुकेले ॥ ४ ॥

पंचचामर.

[3]आश्विनांत वद्य द्वादशीस येतसे भला ॥
उत्सहासि शिष्यसंघ योग त्यासि लाभला ॥
दूर देशिंचेहि लोक उत्सहासि पातले ॥
रामरूप पाहुनीच फार सौख्य पावले ॥ ५ ॥

मालिनी.

रथ फिरुनि मठातें पातला रात्रिकालीं ॥
उजळलि बहु ज्योती तेधवां भोंवतालीं ॥
वदत प्रभु मधें हा शेवटींचीहि सेवा ॥
मम करि बहु तोषें घेइजे देवदेवा ॥ ६ ॥

पृथ्वीवृत्त.

प्रसाद करुणाघना करिं मिळे तदा सज्जना ॥
उणें न कवणा मनामधिं गमे नुरे कामना ॥
नसेचि स्मरणाविना गति वदे सुसेवा मना ॥
इथूनि न घडे पुन्हा अमुचि भेटि गा बा मना ॥ ७ ॥

---

१ श्रीरामभाऊ महाराज यांचे द्वितीय चिरंजीव. यांचे मौंजीबंधनास उद्देशून म्हटलें आहे २ श्रीरामभाऊ महाराज यांचे ज्येष्ठ चिरंजीव दाजीसाहेब महाराज यांचे विवाहसमारंभास. यांनाच ती तात्यासाहे. यानीं आपली ज्येष्ठ कन्या दिली होती. हे शके १८२२ भाद्रपद शु० ३ स निजधामास गेले. ३ श्रीक्षेत्र चिमड येथें आश्विन वद्य १२ पासून कार्तिक शुद्ध ५ पर्यंत श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांचा उत्सव होत असतो. कार्तिक शुद्ध ५ स रथोत्सव होतो.

मालिनी.

प्रथम नवमि आली मार्गशीर्षांत ऐका ॥
निज प्रभु भगिनी तैं सांगती मात लोका ॥
त्यजुनि भुवन आतां राम हा चालिला हो ॥
वरद जन असे तो दर्शनें पुण्यलाहो ॥ ८ ॥

परिसुनि अशि कर्णीं सज्जनी दुःखवाणी ॥
स्रवत नयनिं पाणी विव्हु जे प्रेमवाणी ॥
नमुनि उभय पाणी बापुडी दीनवाणी ॥
निघाति जन शिराणी पाहण्या सौख्यखाणी ॥९॥

वसंत तिलक.

आरामधाम प्रभु राम जिथें निजेला ॥
त्या पाहती निगमिं जो बहु वानिजेला ॥
मूर्ती विलोकिति तदा गुरुमाउलीची ॥
नेत्राभिराम नयनीं सुरगाउलीची ॥ १० ॥

द्वारांतरीं सुजनसंघ लवोनि पाहे ॥
रामा अराम न गमे नच बोलताहे ॥
ओवाळिती स्तविति तैं सुमनप्रवाहें ॥
दुःखातिरेक नयनीं नच नीर राहे ॥ ११ ॥

पंच चामर.

नमोस्तुते निरंजनाय वेदगर्भरूपिणे ॥
नमोस्तु दुःखभंजनाय सर्वविश्वसाक्षिणे ॥
नमोस्तु ज्योतिरूप निर्मलात्मसौख्यदायिने ॥
नमोस्तुते नमोस्तुते नमोस्तुते नमोनमः ॥ १२ ॥

नमोस्तु राम चिंमडाभिधानग्रामवासिने ॥
नमोस्तु राम निर्मलांगसंगपापहारिणे ॥
नमोस्तु राम पूर्णकाम साधुभिस्तुगीयते ॥
नमोस्तुते नमोस्तुते नमोस्तुते नमोनमः ॥ १३ ॥

अमृत ध्वनि.

माया-महोदधिंत जाया सुतादि-युत वाया भ्रमें बुडविले ॥
काया बहू शिणालि सायास सांगु किति रायाथ रंक श्रमले ॥
पाया तुझे शरण जायाऽविलंब मति माया तयाचि तुजसी ॥
गाया स्वनाम सुख द्याया त्वरा करुनि छायातपत्र
धरिसी ॥ १४ ॥

ध्यावा प्रभू सुमनिं गावा परात्पराचि पावाल ते पद महा ॥
जावा तथा शरण व्हावा सुमार्ग जरि नांवापरी करित हा ॥
रावाथ रंक खलु यावा धरोनि मानिं लावा मनें गुरुपदीं ॥
गोवा नसे पुढति जीवा शिवत्व पद द्यावाचि मोक्ष
सपदीं ॥ १५ ॥

नामा तुझ्या वरुनि कामादिका दमुनि शामाभिराम पवले ॥
भामासुता तनय हेमादिस्तोम मनि पामासमान गमले ॥
सीमा नसे खचित प्रेमा तुझ्या अमित व्योमापरि स्थिति
असी ॥
रामा कसा धरुनि नेमावसान निजधामाभियान
करसी ॥ १६ ॥

वसंत तिलक.

बद्धांजुलीकृत विलोकुनि शिष्यमेळा ॥
प्रेमाश्रु तैं अणितसे गुरुराज डोळा ॥
रामा तुम्हांविण पुढें गति काय बोला ॥
आतांचि कां धरियला प्रभुजी अबोला ॥ १७ ॥

मंदाक्रांता.

बोले स्वामी इथुनि हि अका लेकुरें हीं जपावीं ॥
मानोनीया वचन तुमचें साधनें हीं तपावीं ॥
हातीं तेव्हां निज भगिनिच्या वोपियेलें सुतातें ॥
दोघांनीं ही पुढति करणें आपिलें जें सुतातें ॥ १८ ॥

आश्वासोनी सकल सुजना स्वस्थळा बोळवील ॥
वाटे त्यातें वरि वरि बरें अंतरीं घोळवीलें ॥
आज्ञा माझी नमुनि पुढती आंत कोणासि नाणा ॥
मौन्यें राहा भृगुदिनिं बरें सर्व होईल जाणा ॥ १९ ॥

मालिनी.

हरिदिनि निशिमाजीं मार्गशीर्षांत जाणा ॥
द्वितिय प्रहरकालीं शुद्धपक्षीं सुजाणा ॥
हरिहरसुर येती न्यावया रामराणा ॥
परमपद जयाचें नाकळे जें पुराणा ॥ २० ॥

मुनिगणयुत तेव्हां सद्गुरूमूर्ति आली ॥
सकळ स्वजन येतां चित्तवृत्ती मुराली ॥
नमुनि गुरुपदातें बाप माझा निघाला ॥
वदत गुरुयशातें रामरूपीं मिळाला ॥ २१ ॥

पृथ्वीवृत्त.

शकाब्द अठरा शतावरि त्रयोदशी वत्सरीं ॥
खराख्य भृगुवासरीं निशित मार्गशीर्षीं वरी ॥
विशुद्ध खरि पक्षिणी हरिदिनीं तयीं निर्गुणीं ॥
मिळोनि प्रभु हा त्यजी स्वतनु गाइजे तो गुणीं ॥ २२ ॥

मालिनी.

हृदय पिटित दुःखें आरडे रामजाया ॥
परम विरहयोगें प्राण पाहेचि जाया ॥
करित रुदन भारी शोक तो वर्णवेना ॥
कठिण प्रळय आला काळ कीं जाणवेना ॥ २३ ॥

मंदाक्रांता.

कोण्या पुण्यें पदरिं पडलें रामराया सुकांता ॥
भाग्यश्रेष्ठाविण कसि पुढें काळ कंठील कांता ॥
देवा माझें सुकृत सरलें जाहलें मी अभागी ॥
बाळें माझीं बहुत चिमणीं कोणि नोहे विभागी ॥ २४ ॥

## शिष्यजन-विलाप.

मंदाक्रांता.

हा हा रामा त्यजुनि सखया चालिलासी पुढारा ॥
पाठीराखा तुजविण जगीं कोण आम्हासि थारा ॥
कोणाचें या पुढति मुख तें सांग आम्हीं पहावें ॥
दुःखामाजीं प्रभुविण जगीं सांग कैसें रहावें ॥ २५ ॥

हा हा गेली त्यजुनि हरिणी पाडसा केवि रानीं ॥
दुःखाग्नीनें हृदय जळतें ताडिलें कीं शरानीं ॥
कैसी वत्सावराति रुसुनि दूर धेनू पळाली ॥
पाही देवा बहुत विरहें बापुडी ही गळाली ॥ २६ ॥

स्वामी तूझे चरण धरितां जन्म मृत्यू गळाले ॥
सृष्टीमाजीं बहुत शिणतां जें न कोणा मिळालें ॥
पापी आम्हीं नयनिं बघतों नित्य ब्रह्म-स्वरूपा ॥
रामा वानूं कितितरि कृपा तूमची ही अमूपा ॥ २७ ॥

रामा सांगे तव जननिनें कोणतें पुण्य केलें ॥
तेणें तीच्या सुभर उदरीं रत्न हें प्राप्त झालें ॥
ऐशा शब्दें सुजन करिती शोक तो पाहुनीया ॥
आश्वासोनी अभय वर दे माय ती धावुनीया ॥ २८ ॥

पंच चामर

रामराय[1] राममाय राम गाय सर्वदा ॥
राम हेम राम नेम रामप्रेम तें वदा ॥
राम धर्म राम कर्म राम वर्म संपदा ॥
राम चित्त राम वित्त राम नित्य दे पदा ॥ २९ ॥

---

१ हे श्लोक श्रीरामचंद्रराव महाराज परगट्टीकर मठ चिमड हे निजधामास गेल्यावर रा. तात्यासाहेब यांनी केलेले आहेत.

## श्लोक २

[1]नव्हे तेज वायू नव्हे भूमि पाणी ॥
नव्हे व्योम ना अंश त्याचेचि जाणी ॥
असा निर्गुणीं अंतरात्मा पहावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १ ॥

नसे हात ना पाय या निर्गुणातें ॥
निराकारही मानवेना तयातें ॥
निराकार साकार ऐसा वरावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ २ ॥

म्हणूं शुक्ल कीं कृष्ण श्यामाभिरामा ॥
नसे पीत रंगा सुरंगासि सीमा ॥
बहूरंगि हा सज्जनीं आकळावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ३ ॥

पहा राम हा बिंदुरूपेंचि येतो ॥
पुढें पाहतां रूपविस्तार घेतो ॥
सदा वाटतें हा पुढेंची असावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ४ ॥

नभीं राम मुक्ताफळें वर्षताहे ॥
क्षणीं नागरूपें पुढें डोलताहे ॥
जगाचा धणी दृष्टिमाजी भरावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ५ ॥

पहा व्योमगर्भांतरीं दिव्य तारे ॥
किती दीसती शोभती गोजिरे रे ॥
सुरांचा प्रभू राम हा ओळखावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ६ ॥

---

१ हे श्लोक " कैवल्यवैभव " पुस्तकांत छापून आलेले आहेत.

तुझ्या नेत्रपातीं लवे नीळबिंदू ॥
कसा दीसतो साधका पूर्ण इंदू ॥
बहू लाघवी चंद्रमा हा बघावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ७ ॥

नभा घातलीसे गमे मुक्तजाळी ॥
बरी शोभते साधकाच्या सुभाळीं ॥
असें दाखवी रूप तो नित्य ध्यावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ८ ॥

बरीं अंबरीं कुंडलें डोलताती ॥
बहू कच्छ मत्स्यें पुढें हालताती ॥
जया पाहतांची तुटे शोक हेवा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ९ ॥

पहा लागली ही कशी मुक्तवेली ॥
परंज्योतिरूपें नभामाजिं ठेली ॥
असा नित्य ठेवा सुखाचा जपावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १० ॥

कदा रूप हें अग्निसंगें जळेना ॥
तया तीक्ष्ण शस्त्रें कदा खंडवेना ॥
असा शाश्वतात्मा बुधें ओळखावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ ११ ॥

तुरे मोहरे भेरि त्या वाजताती ॥
मना साधकांच्या बहू हर्ष देती ॥
अनूहात हा नाद त्वां आयकावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १२ ॥

नभोमंडपीं रत्नदीपा विलोकीं ॥
बुझेना प्रभा ती कदा या सुलोकीं ॥
भला लाधला साधका पूर्व ठेवा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १३ ॥

किती श्वेत मूर्ती किती श्याम मूर्ती ॥
स्रवों लागती साधकाच्या सुपंथीं ॥
मना साधनें सद्गुरू डोलवावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १४ ॥

दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा ॥
महाविष्णु हा दंडरूपें सुजाणा ॥
सदाशीव तो बिंदुरूपीं पहावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १५ ॥

कधीं राम हा कृष्णरूपेंचि भासे ॥
उभा राहिला धेनुपाशीं विलासे ॥
किती सोहळा साधकाचा वदावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १६ ॥

प्रभू राम हा रामरूपेंचि आला ॥
सवें बंधु शोभे करीं चाप त्याला ॥
असा स्वामि माझा किती आठवावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १७ ॥

मना जाहलें सर्व कांहीं बरें रे ॥
परी शेवटीं जाहलें बोखटें रे ॥
गुरू राम गेला समस्तां विसावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १८ ॥

मना तूजला सांगता कोणि नाहीं ॥
मना साधनीं तूं मला साह्य होई ॥
मना संग हा कुत्सितांचा त्यजावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ १९ ॥

मना राम-पाया कदा तूं न सोडी ॥
मना रामनामीं धरी नित्य गोडी ॥
मना सद्गुरू राम प्रेमें भजावा ॥
मना राम तो अंतरीं सांठवावा ॥ २० ॥

मना दास-चित्तास विक्षेप नाणी ॥
सदा सर्वदा राहुं दे राम वाणी ॥
असें तूं कृपेनें करी बा दयाळा ॥
नको चाळवूं पाहुं दे राम डोळां ॥ २१ ॥

---

श्लोक

मी हीन सर्वांपरि रामचंद्रा ॥
तूं रे दयाळू करुणासमुद्रा ॥
माझे वरे वाइट सर्व कोटी ॥
अपराध सारे प्रभु घाल पोटीं ॥ १ ॥

---

लोकीं या गुरुभक्ति जोडिलि तुवां अर्पोनि देहा धना ॥
केलें कीर्तन नाम गायन सदा साधूनिया साधना ॥
केलें तुष्टचि पांडुरंग जनका केला कुलाद्धोरही ॥
मातेची तव कूस धन्य जगतीं कीर्ती तुझी थोर ही ॥ १ ॥

रघुनाथ कोटनीस.

# कैवल्यकुसुम.

## प्रकरण ३ रें.

के. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस व त्यांचे
चुलते कै. ती. गु. भ. प. वामनरावजी कोटनीस यांचे दरम्यानचा
*पत्रव्यवहार

### अभंग १.

ता. १५।६।१९०६.

सद्गुरुच्या हातें, दिलें आत्मज्ञान, ।
दुर्लभ विधान, ब्रह्मादिकां ॥ १ ॥
ऋणांतुनि मज, मुक्त करी जो कां, ।
धन्य जगीं देखा, वायुपुत्र ॥ २ ॥
सद्गुरुपादुका, लाधल्या जयाल, ।
जगीं मान्य झाला, हनुमंत ॥ ३ ॥
दृढ विश्वासानें, नित्य करी पूजन, ।
सद्गुरुकृपाघन, संतुष्टची ॥ ४ ॥
निष्काम वासना, नित्य हरीकीर्तन, ।
निशिमाजीं जाण, करीतसे ॥ ५ ॥
धन्य त्रिभुवनीं, सद्गुरुचरणीं, ।
जाय लोटांगणी, नित्य नित्य ॥ ६ ॥

---

*ती. कै. तात्यासाहेबांचे चुलते ती. कै. वामनरावजी कोटनीस यांचे व ती. तात्यासाहेब यांचे दरम्यान झालेला पत्रव्यवहार या प्रकरणांत दिला आहे. त्यांत परस्परांनीं परस्परांबद्दल काढिलेले प्रशंसोद्गार वाचून दोघेही अध्यात्मदृष्ट्या केवढे अधिकारी होते याची कल्पना सहज होईल. प्रथम ती. कै. वामनरावजींचा अभंग व त्यास ती. कै. हणमंतरावजींचा उत्तरादाखलचा अभंग अशा तऱ्हेनें मांडणी केलेली आहे.

खरा आत्मज्ञानी, माझा भ्रातसुत, ।
जया सद्गुरुनाथ, कृपा करी ॥ ७ ॥

## अभंग २.

ता. २७।३।१९०६.

सद्गुरुचा विश्वास, वामनाचे मनीं, ।
येत लोटांगणीं हनुमंत ॥ १ ॥
रामनामीं रत, वामनाची वाणी, ।
येत लोटांगणीं हनुमंत ॥ २ ॥
रामरूप भरलें, वामननयनीं, ।
येत लोटांगणीं हनुमंत ॥ ३ ॥
दशविध वाद्यें, वामनाचे कर्णीं, ।
येत लोटांगणीं हनुमंत ॥ ४ ॥
केली अघटीत, साधनाची करणी, ।
येत लोटांगणीं हनुमंत ॥ ५ ॥

## अभंग ३.

ता. ५।७।१९०६.

"बावन्न" कोटी, जपसंख्या झाली, ।
सद्गुरु माउली, पूर्ण कृपें ॥ १ ॥
शकें आठराशें, एकुणतीसवरी, ।
प्लवंगवत्सरीं, ज्येष्ठमास ॥ २ ॥
वद्य द्वितियेसि, गुरुवासरेसी, ।
उदगयनेसी, ग्रीष्मऋतु ॥ ३ ॥
उपदेश घेवोनी, वीस अब्दें गेलीं, ।
अनंत देखिलीं आत्मरूपें ॥ ४ ॥
ॐकार संयुक्त, रामनाम ध्वनि, ।
वेदघोष श्रवणीं, नाना वाद्यें ॥ ५ ॥

ऐके अनुदिनीं, सद्गुरुची करणी, ।
शेष-वेदा-लागुनी न वर्णवे ॥ ६ ॥
रामदास समर्थ, निजधामीं जाता, ।
संवाद तत्वता, रामासवें ॥ ७ ॥
अभंगरूपानें, झाला तोचि ऐका, ।
आळस करूं नका, भाविक हो ॥ ८ ॥

## अभंग ४.

ता. ७।७।१९०६.

' बावन्न ' कोटी जपसंख्या झाली, ।
अत्यंत तुष्टली चित्तवृत्ती ॥ १ ॥
' बावन्न ' कोटिचेनि नेत्रें पुंजाळलीं, ।
ज्योती प्रगटली बावन्न कसी ॥ २ ॥
पंचरंगी पक्षी, जो कां तुकयाचा, ।
बावन्न परेचा, जोडियेला ॥ ३ ॥
बावन्न मातृकांचा, धणी जो समर्थ, ।
ओंकार अव्यक्त, साधियेला ॥ ४ ॥
" बुधबावन्नी " ग्रंथ अर्थ पै सखोल, ।
लाधिलेसे फळ, गुरुकृपें ॥ ५ ॥
धन्य तें साधन, धन्य धन्य जिणें, ।
येरा लाजिरवाणें करुनी ठेलें ॥ ६ ॥
सद्गुरु महाराज, करी कृपा पूर्ण, ।
वृत्ती ही वामन, जाहली असे ॥ ७ ॥
वामना बांधिलें, नेत्राचिये द्वारी, ।
साधन सामुग्री, बळिवंत ॥ ८ ॥
ऐशा बळिवंताचे, पायीं पै नमन, ।
अंजनीनंदन करितसे ॥ ९ ॥

## अभंग ५.

ता. १२।७।१९०६.

पति सासुश्वशुर, जावा नणंदा दीर, ।
सासुरीं निरंतर, जाच मज ॥ १ ॥
रात्रंदिन काम, क्षण नसे विश्रांति, ।
अन्न न घालिती, पोटभरी ॥ २ ॥
एक सुरी उरी, जाय मारलीया,
प्राण प्राणप्रिया देवराया ॥ ३ ॥
एक पुरे असुरी, प्राणहरणाशी, ।
सहांच्या सायासीं, कैसी वांचूं ॥ ४ ॥
प्रपंच भ्रतार, श्वशुर अहंकार, ।
तृष्णा आशा थोर, गांजीताती ॥ ५ ॥
अविद्या ही नणंद, क्रोध तोचि दीर, ।
छळ माझा फार, करिताती ॥ ६ ॥
सुटेनाची काम, उपवास पडिले, ।
मिळेनासें झालें, अन्न ब्रह्म ॥ ७ ॥
पाव मज आतां, सोडवी यातना, ।
अगा नारायणा, दीनबंधू ॥ ८ ॥
सत्य सती तीची, येऊंद्या करुणा, ।
जन्ममृत्युहरण, दास म्हणे ॥ ९ ॥

## अभंग ६.

ता. १४।७।१९०६.

वामनाची वाणी, धन्य त्रिभुवनीं, ।
जप निशिदिनीं, वामनाचा ॥ १ ॥
वामना लाधला, वामन सद्गुरु, ।
त्रिविक्रम थोरु, दाविथेला ॥ २ ॥

वामनचि जाणे, वामनाची सेवा, ।
व्यर्थ करिती हेवा, अन्य जन ॥ ३ ॥
नाभीपासोनिया, मस्तकापर्यंत, ।
त्रिपाद भूमि देत, वामनासी ॥ ४ ॥
ऐशा भूमिदानें, धन्य धन्य काया, ।
वामन कृपा छाया, वामनासी ॥ ५ ॥

## अभंग ७.

ता. २८।७।१९०६.

हनुमंतरायासी, नव्हे उतराई, ।
ऋणांतुनी पाही, मुक्त केलें ॥ १ ॥
सद्गुरु स्वामीची, कृपा संपादिली,
तेणें तोडियेली, भव-बाधा ॥ २ ॥
सत्य आत्मज्ञानें, सन्मार्गी वर्तन, ।
अहर्निशी स्मरण, रामनाम ॥ ३ ॥
न मागें कोणासि, नेघें पापद्रव्य, ।
करीतसे व्यय, सत्पात्रींच ॥ ४ ॥
यामिनी माझारी, कीर्तन करीत, ।
साधिला परमार्थ, वामन म्हणे ॥ ५ ॥

## अभंग ८.

ता. ३०।७।१९०६.

हनुमंताचा राय, श्रीरामसद्गुरु, ।
आत्मऋणभारु, मुक्त करी ॥ १ ॥
सांगितली सेवा, करितां यथार्थ, ।
सर्व मनोरथ, पूर्ण करी ॥ २ ॥
संताचा जो मार्ग, अहर्निशीं स्मरण, ।
विधलीसे खूण, निजकृपें ॥ ३ ॥

रामनाम हेंचि, एक निजधन, ।
तयाविण जाण, पाप द्रव्य ॥ ४ ॥

अखंडित वाचे, श्रीराम स्मरण, ।
हेंचि पै कीर्तन, दासालागीं ॥ ५ ॥

## अभंग ९.

ता. ११।९।१९०६.

सद्गुरुची कृपा, जेणें संपादली, ।
त्याची चिंता गेली, देशोधडी ॥ १ ॥

काळभया हरिलें, गेली भवभीति, ।
जन्ममरण पंक्ती नासोनिया ॥ २ ॥

ऐसा तो सद्गुरु, लाधे ज्ञानेश्वरु, ।
पुण्याचा तो मेरु, उचंबळला ॥ ३ ॥

उपदेश मात्रें, दावी जनार्दना, ।
वैकुंठींचा, राणा आत्माराम ॥ ४ ॥

उपदेश मिळोनि, वीस अब्दें गेलीं,
अनंत पाहिलीं, निर्गुणरूपें ॥ ५ ॥

जपसंख्या झाली, कोटि एकसष्ट, ।
वरी पन्नास लक्ष, सद्गुरुकृपें ॥ ६ ॥

धन्य तो सद्गुरु, लाधे वामनासी, ।
दावी विश्वात्म्यासी, जनीं वनीं ॥ ७ ॥

## अभंग १०.

ता. २५।९।१९०६.

केला वाल्मीकानें, शतकोटि ग्रंथ, ।
प्रसिद्ध जगांत, रामायण ॥ १ ॥

तोवि नामदेवें, शतकोटि अभंग, ।
विठ्ठलकृपें सांग, पूर्ण केलें ॥ २ ॥

तैशीं शतकोटि, जपसंख्या व्हावी, ।
दया पै करावी, सद्गुरूंनीं ॥ ३ ॥

सद्गुरुची दया, जयालागीं होय, ।
तयालागीं काय, उणें असे ॥ ४ ॥

उणें नसे राम, सदा आत्माराम, ।
भक्ता पूर्ण काम, करीतसे ॥ ५ ॥

सद्गुरुचे शिष्य, शतकोटी जाहले, ।
नाहीं कष्टविले, देह ऐसे ॥ ६ ॥

वामनाचे परी, वामन वाढत, ।
तया दंडवत, दास करी ॥ ७ ॥

## अभंग ११.

ता. ५।१०।१९०६

काया-निक्षेपण, मज करावया, ।
आज्ञा देवराया, देई त्वरें ॥ १ ॥

असंख्य यातना, होती शरिरासी, ।
तूं काय नेणसी, अंतरात्मा ॥ २ ॥

नको मज ठेऊं, मृत्युलोकीं आतां, ।
क्षणही तत्त्वतां, अनाथासी ॥ ३ ॥

सद्गुरुच्या मठीं, करीं देह-पात, ।
पापनाशिनींत, आनंदानें ॥ ४ ॥

## अभंग १२.

ता. ९।१०।१९०६.

मृत्युलोकीं नरदेह, अमर इच्छिताती, ।
ऐशी दुर्लभ प्राप्ती सहज हातीं ॥ १ ॥

अमूल्य नरदेहीं, साधन साधिलें, ।
निधान जोडिलें वैकुंठीचें ॥ २ ॥

ऐशिया देहाचा, कंटाळा करून, ।
नरदेहचिद्रत्न दवडूं नये ॥ ३ ॥
जो कां जन्मा आला, कधीं तरी त्याला, ।
सोडूनि देहाला, जाणें असे ॥ ४ ॥
साधन संपत्ती, जैसी जोडियेली,
तैसी वृद्धी केली, पाहिजे पुढें ॥ ५ ॥
मतिमंद दासा जेवढें कळत,
तेवढें सुचवीत, विनंतीनें ॥ ६ ॥

## अभंग १३.

ता. १२।११।१९०६.

हरोनि आपदा, सद्गुरु जोडिला, ।
त्याच्या उतराईला नसे कोणी ॥ १ ॥
नुपेक्षीना कदा, सांभाळ सर्वदा, ।
त्रास न करी मुदा सशोदीत ॥ २ ॥
मंदबुद्धि मज, आत्मज्ञानी करी, ।
दावी निर्गुण हरी, ऋणही हरी ॥ ३ ॥
तयालागीं करोत, कुटुंबासहीत, ।
चिरायु निश्चित, सद्गुरुराज ॥ ४ ॥
राहो सदा नाम, मानी आणि सुमतिसी, ।
सद्गुरुरायासी, हेंचि मागें ॥ ५ ॥
वमनासमान, मानी परधन, ।
रजनीं कीर्तन, नित्य करी ॥ ६ ॥
धन्य मीच जगीं, भ्रातृज जोडिला, ।
भवपार झाला, गुरुकृपें ॥ ७ ॥

## अभंग १४.

ता. १९।११।१९०६.

समर्थ सद्गुरु चरणाविण थारा, ।
नाहीं या विचारा दृढ केलें ॥ १ ॥

चपळ हें मन चंचळ इंद्रियें, ।
ठकविती स्वयें काय करूं ॥ २ ॥

शम दम गुण जईं हातीं येती, ।
तैंची त्याची भीति दूर होय ॥ ३ ॥

सद्गुरुचें नाम विश्वास ठेवोनी, ।
जपतसे मनीं प्रेमानंदें ॥ ४ ॥

नामाविण गती, नाहीं त्रिजगतीं, ।
संकटें नासती, नामोंचि या ॥ ५ ॥

श्रीराम किंकरु, नामें हनुमंत, ।
करावा पुनीत हेंचि मागें ॥ ६ ॥

## अभंग १५.

ता. २७।२।१९०७.

सद्गुरुची आज्ञा, सत्य पैं पाळिली, ।
मोक्षश्री जोडिली, हातोहातीं ॥ १ ॥
सद्गुरुची अवज्ञा, जो कां शिष्य करी, ।
पडे तो अघोरीं, कुंभिपाकीं ॥ २ ॥
व्यर्थ जन्मा आला, चांडाळ तो खरा, ।
त्यासी नसे थारा, इहपर ॥ ३ ॥
सद्गुरुसारखें, दैवताचि नाहीं, ।
ऐसें वेद पाही वदताती ॥ ४ ॥
धन्य हनुमंत स्वार्थत्याग केला, ।
सद्गुरु आज्ञेला, अनुसरी ॥ ५ ॥
नित्य श्रीपाद पूजा, निशींत कीर्तन, ।
आत्मज्ञानी निपुण, श्रीगुरुकृपें ॥ ६ ॥

## अभंग १६.

ता. ५।३।१९०७

स्वरूपसंपत्ती, परलोक-साधन, ।
हेंचि मुख्य धन, मेळविलें ॥ १ ॥

श्रीक्षेत्र चिमड येथील कै. गु भ. प. ती. हणमंतरावजी कोटनीस यांनीं बांधविलेली धर्मशाळा.



रामनाम वाणीं, रामनाम मनीं, ।
रामरूप जनीं, पाहियेलें ॥ २ ॥
प्रपंचीं विपत्ती, परमार्थी संपत्ती, ।
हीच सत्य स्थिती, साधकाची ॥ ३ ॥
द्वादश वर्षांत निद्रालस्यवश, ।
न होतां परेश, तुष्ट केला ॥ ४ ॥
मुखें वर्णवेना, श्रम पडिभार, ।
करिती परिहार सद्गुरु ते ॥ ५ ॥
बहुतचि शिष्य, सद्गुरुचे झाले, ।
कोणी नाहीं केले, श्रम ऐसे ॥ ६ ॥
श्रमापरि फळ, मिळालें पदरीं, ।
येर निद्राहारी, व्यर्थ गेले ॥ ७ ॥
सद्गुरुची आज्ञा, सत्य पै पाळिली, ।
मोक्षश्री जोडिली हातोहातीं ॥ ८ ॥
हातोहातीं राम, जगाचा विश्राम, ।
कैवल्याचें धाम, दास म्हणे ॥ ९ ॥

कै. ती. गु. भ. प. वामनरावजी कोटनीस यांनीं
ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस यांचेवर केलेलीं पद्यें,

## अभंग १७.

चिम्मडच्या मठीं, श्रीसद्गुरुपादुका, ।
ठेवण्यासी देखा, धर्मशाळा ॥ १ ॥
सद्गुरु आज्ञेनी, बांधवी हनुमंत, ।
परम तो भक्त कोटनीस ॥ २ ॥
शक अठराशें, वरी एकुणतीस, ।
प्लवंगवत्सरास, प्रारंभचि ॥ ३ ॥

## अभंग १८.

अनंत पुण्येंनी, लाधल्या पादुका ।
सद्गुरुच्या देखा, हनुमंतासी ॥ १ ॥
कल्पकोटि काशी, केलिया निवास, ।
नये साम्यतेस, पुण्य कांहीं ॥ २ ॥
कोटिकल्प प्रयागीं, त्रिवेणी स्नानासी, ।
नये बरोबरिसी, सुकृत हें ॥ ३ ॥
बहु कल्पकोटि, केल्या वास गये, ।
पुण्य कदा नये, तुळणेसी ॥ ४ ॥
व्रत नेम दान वातांबु-पर्णाशन, ।
केल्या तीर्थाटन, चारी दिशा ॥ ५ ॥
याच्या सम पुण्या, न तुके कल्पांतीं,
श्रुति-स्मृती-उक्ती, स्पष्ट असे ॥ ६ ॥
दर्शनेंचि होती, कोटि कुळें उद्धार, ।
ऐसा असे निर्धार, वामनाचा ॥ ७ ॥
सद्गुरुचा दास, सांगे गर्जोनिया, ।
याहो धावोनिया भाविक हो ॥ ८ ॥

## अभंग १९.

पादुका मिळाल्या, सद्गुरु लाधला, ।
उणें काय त्याला, सांगा आतां ॥ १ ॥
असोनी संसारीं, त्रिकाल दर्शन, ।
सद्गुरु चरण, पादुकांचे ॥ २ ॥
धन धान्यादिक, अशाश्वत सर्व, ।
शाश्वत वैभव, लाधलें कीं, ॥ ३ ॥
धन्य धन्य जाणा, जगीं हनुमंत, ।
खरा भाग्यवंत, आत्मज्ञानी ॥ ४ ॥

## कै. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस.

जन्म.
कार्तिक शु. ८
शके १७८६

निर्याण.
पौष व. ६
शके १८४५



होता संग्रह पुण्यरूप पहिला श्रीसद्गुरू भेटला ।
ज्यानें अज्ञ जनांसि पार तरण्या सन्मार्ग तो दाविला ॥
केले पूर्ण मनोरथा झिजवुनि देहासि कष्टे पहा ।
त्या **श्रीमद्धनुमंतसद्गुरुपदीं** माझा नमस्कार हा । १ ॥

**रघुनाथ.**

सदा सर्वकाळ, नामाचें चिंतन, ।
रजनी कीर्तन, प्रेमयुक्त ॥ ५ ॥
कीर्तन करोनी, पैसा नाहीं घेत, ।
नाहींच मागत, कोणा कांहीं ॥ ६ ॥
साधूशिरोमणी, तुकाराम वाणी, ।
तया अनुसरोनी, वागतसे ॥ ७ ॥
नसे काळभय, जन्ममरण धोका,
मिळाल्या पादुका सद्गुरुच्या ॥ ८ ॥
म्हणोनी वामन, घाली लोटांगण,
भक्तीयुक्त जाण, पादुकांसी ॥ ९ ॥

२८८

## ओव्या २०.

जैशा श्रीराम पादुका भरतासी ।
तैशाच लाधल्या हनुमंतासी ॥
सद्गुरु चरणींच्या अति विशेषी ।
या भाग्यासी जोड नाहीं ॥ १ ॥
दुर्लभ ब्रह्मादि देवासीं ।
अनायासें मिळाल्या सच्छिष्यासी ॥
सेवा न करितां सायासीं ।
सहजगतेसी लाभल्या ॥ २ ॥
बहु जन्मींचें पुण्य फळासी ।
आलें म्हणोनी लाभ अनायासी ॥
भवतारक पादुका निःसंदेहेसी ।
नव्हे कल्पांतेसी काळभय ॥ ३ ॥
सहस्रावधी वर्षे तप करिती ।
वातांबु गलित पर्णें सेविती ॥
नाना साधनीं परम श्रमती ।
तरी नोहे प्राप्ती सद्गुरूची ॥ ४ ॥

समर्थ सद्गुरुची कृपा होतेक्षणीं ।
अनंत रूपें प्रगटे चक्रपाणी॥
काय मी वाखाणूं अद्भुत करणी ।
वेद शेष वाणीसी अशक्य ॥ ५ ॥

सद्गुरु लाधला वामनासी ।
परम दुर्लभ योगीयासी ॥
अनंतस्वरुपीं देवाधिदेवासी ।
अहर्निशीं पाहतसे ॥ ६ ॥

## ओव्या २१.

पाप-पर्वत भस्म होती क्षणांत ।
दुर्लभ दर्शन सकळ निश्चित ॥
काय मी पामर वदूं त्याची मात ।
ऐशा समर्थ सद्गुरुपादुका ॥ १ ॥

पापी तरती दर्शनें करून ।
दुर्मिळ देवादिकांलागून ॥
काय पुण्यें प्राप्त हनुमंतालागून ।
सद्गुरुपादुका धन्य धन्य ॥ २ ॥

पावन झालों पादुका पाहून ।
दुःसाध्य साध्य वामना जाण ॥
कासया चिंता गेली भवभीति हरून ।
अनन्य वंदीन पादुका ॥ ३॥

## ओव्या २२.

धन्य धन्य पवनात्मज निश्चिती । निरपेक्ष नित्य कीर्तन करित रात्री ॥
सदा नाममंत्र चित्तीं । अगाध ख्याती काय वानूं ॥ १ ॥

पूर्वार्जित सुकृतें करुनी । सद्गुरु लाधला मोक्षदानी ॥
सुमंत्र सांगोनिया कानीं । दावी जनींवनीं रामराया ॥२॥

अन्योपार्जित द्रव्य ने घे कदा । ध्यान नामावळी सर्वदा ॥
हरोनि दैन्य दुःख आपदा । सद्गुरुपादुका संपदा
मिळाल्या ॥३॥

नित्य दिवसा पादुकार्चन । निशीं होत हरिकीर्तन ॥
टाकोनिया दुराभिमान । सद्गुरुचरण आठवीत ॥ ४ ॥

## अभंग २३.

कीर्तन ऐकोनी । संतुष्ट ते होती ।
भाविक निश्चिती । भक्तिभावें ॥ १ ॥

न मागे कोणा । संतुष्ट सर्वदा ॥
त्यागोनी आपदा । दुर्बुद्धिसी ॥ २ ॥

नित्य करी पूजा, सद्गुरुपादुका ॥
नेम निष्ठें देखा । यथासांग ॥ ३ ॥

धन्य हनुमंत । पांडुरंगसुत ॥
पूर्वजां उद्धरीत, आत्मज्ञानीं ॥ ४ ॥

पितृव्य वामन । सद्गुरूपासोनी ।
केलें आत्मज्ञानीं । सत्य जाणा ॥ ५ ॥

त्याच्या उपकारा नोहे उतरायी ।
मेरूपुढें राई तद्वतची ॥ ६ ॥

## पद.

( चाल– ब्रम्हन्हक्किसेनाऊ )

ब्रह्मपुरीं आम्हीं जातों रे। कोण येतो कां रे ॥
संगें येईल त्यासी नेतों रे। लाभ होतो रे ॥ध्रु०॥
गुरुपादिं शरण आधिं व्हावें रे। नाम घ्यावें रे ॥
गुरुनाम निशिदिनीं गावें रे। रूप पहावें रे ॥ १ ॥
नामांत राम प्रगट होतो रे। भेट देतो रे ॥
नेईल तिकडे हा येतो रे। मुक्ती देतो रे ॥ २ ॥
दासाचा निश्चय पाही रे। शंका नाहीं रे ॥
सद्गुरुपद धरुनी राहीं रे। मुक्ती लाही रे ॥ ३ ॥


---

१ सदर पद ती. तात्यासाहेब यांनीं आपल्या निर्याणाच्या अगोदर थोडे दिवस कीर्तनांत म्हटलें; पण त्यांच्या बरोबर ब्रह्मपुरी जावयास तयार होणारा इसम कोणी भेटलासें वाटत नाहीं!

## कै. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोटनीस.

जन्म- कार्तिक शु. ८ शके १७८६ | निर्याण-पौष व. ६ शके १८४५





गुरुभजनविधानीं वेचिलें आयु सारें ॥
गृह-विभव-सुतादी तुच्छ केले पसारे ॥
धरि सहज-समाधि-ध्यान रात्रंदिसा रे ॥
पुनरपि **हनुमंत** व्यक्त झाला कसा रे ॥ १ ॥

**साधुदास**

# कैवल्यकुसुम.

## प्रकरण ४ थें.*

के. ती. गु. भ. प. तात्यासाहेब यांचेवरून
भक्त मंडळींनीं केलेलीं पद्यें.

### अभंग १.

प्रथम शरण सद्गुरुनाथा, शरण तुम्हां हनुमंता ॥ १ ॥
गुप्त सुलभ दाविला मार्ग, अंतरींचा राजयोग ॥ २ ॥
निर्वाणीं नामस्मरण, मंत्र दीला जो गहन ॥ ३ ॥
नामें राम सांपडला, जनीं विजनीं कोंदाटला ॥ ४ ॥
सद्गुरुनीं कृपा केली, आत्मारामीं भेट झाली ॥ ५ ॥
नामें झालों भवपार, आतां चुकली येरझार ॥ ६ ॥
हनुमंत माझा धनी, रघुनाथा पावें जो निर्वाणी ॥ ७ ॥

### अभंग २.

जिवलग माझ्या हनुमंतराया, ।
करी आतां दया पुत्रांवरी ( दासावरी ) ॥ १ ॥
तुजवीण कोणां सांगू सुखदुःख, ।
कोण माझी भूक शमवील ॥ २ ॥
तुजवीण मला ओस दाही दिशा, ।
तव कृपा आशा असे एक ॥ ३ ॥
तुजवीण कोणां जाऊं मी शरण, ।
कोण संरक्षण करिल माझें ॥ ४ ॥

*या प्रकरणांतील अभंग ती. तात्यासाहेब यांचे चि. रघुनाथ हणमंत कोटनीस यांनीं केलेले आहेत.

रघुनाथ म्हणे आलों तुझे पायीं, ।
करी तुज कांहीं आवडे तें ॥ ५ ॥

## अभंग ३.

पावें पावें हनूमंता, तूंच माझी प्रिय माता ॥ १ ॥
तूंचि माझा प्रेमळ पिता, तूंचि माझा सखा भ्राता ॥  ॥
तूंचि माझा सखा चुलता, तूंचि माझी कुलदेवता ॥ ३ ॥
तुझी चाले सर्व सत्ता, तूंचि निर्वाणीचा त्राता ॥ ४ ॥
रघुनाथावरी करीं दया, दावीं आतां तव पाया ॥ ५ ॥

## अभंग ४,

हनूमंतराया दयेच्या सागरा, ।
देवा विश्वंभरा तारीं मला ॥ १ ॥

तुजवीण कोणा करूं मी याचना, ।
कोणासी करुणा येइल माझी ॥ १ ॥

पुत्रार्थीयां पुत्र धनार्थीयां धन, ।
देसी उचलून प्रेम करीं ॥ ३ ॥
तैसें मज पाही नको नको कांहीं ।
चित्त तुझ्या पायीं जडोदे हो ॥  ॥
रघुनाथ म्हणे हेंचि देई देवा, ।
नित्य तुझी सेवा घडावी बा ॥ ५ ॥

## अभंग ५,

बहु दयावंत गुरुमहाराजा, ।
मायबाप माझा हनूमंत ॥ १ ॥
कारितां ना हो ना हो उघडी अंतरीं, ।
समाधान करी भावीकाचें ॥ २ ॥
तयाचिया पदीं ठेवोनी विश्वास, ।
व्हावें सावकास आवडीसी ॥ ३ ॥

रघुनाथ म्हणे त्यांच्या पायीं माझे प्राण, ।
प्रेमें समर्पीन कल्याणासी ॥ ४ ॥

## अभंग ६.

कां न पावासि हनुमंता, राया लक्ष्मीच्या कांता ॥ १ ॥
मन कठीण कां केलें, मज दीना अव्हेरीलें ॥ २ ॥
बहु उद्धरीले जन, त्वां बा पतित पावन ॥ ३ ॥
रघुनाथ म्हणे दीनानाथा, चरणीं ठेवीयेला माथा ॥ ४ ॥

## अभंग ७.

झालों झालों परदेसी, करीं आतां साऊलीसी ॥ १ ॥
तुजवीण हनुमंता, कोण करी माझी चिंता ॥ २ ॥
तुझी लागलीसे आस, होऊं नको बा उदास ॥ ३ ॥
चित्त देईं दीन बोला, करीं आतां करुणेला ॥ ४ ॥
गुरुराया तूं दयाळ, करी रघुनाथाचा सांभाळ ॥ ५ ॥

## अभंग ८.

तुझीया चरणीं ठेवियेला भाव, ।
तेणें माझा जीव समाधान ॥ १ ॥
होणार तें होवो जाणार तें जावो, ।
ठेवीयेला भावो तुझ्या पायीं ॥ २ ॥
तुझ्या पायीं आहे सर्व माझें सुख, ।
मजसी विन्मुख करूं नको ॥ ३ ॥
रघुनाथ म्हणे आहेसी तूं चंद्र, ।
आहे मी चकोर ओशाळलों ॥ ४ ॥

## अभंग ९.

असो माझी सर्व चिंता । गुरुराया हनुमंता ॥ १ ॥
भक्त संकटीं धावसी । प्रेमें तया सांभाळीसी ॥ २ ॥
त्वां बहुत उद्धरीलें । ऐसें तूझें नांव झालें ॥ ३ ॥
रघुनाथ म्हणे राखीं नांव । मज देईं पायीं ठाव ॥ ४

## अभंग १०.

नको गुरुराया मोकलूं मजसी ।
आहें परदेसी तुजवीण ॥ १ ॥
माझे अपराध पाहूं नको आतां ।
राया हनुमंता सांभाळी हो ॥ २ ॥
तुझिया पायांची लागलीसे आस ।
आणिका दिशेस लावूं नको ॥ ३ ॥
रघुनाथ म्हणे न हो पाठमोरा ।
पायीं या पामरा देईं थारा ॥ ४ ॥

## अभंग ११.

अवचित दैवें नरजन्मा आलों ।
परी मीं रंगलों विषयांत ॥ १ ॥
बुद्धीहीन झालों मायेसीं भुललों ।
सन्मार्गा मुकलों दैवहीन ॥ २ ॥
परमार्थमार्गीं आंधळा पांगळा ।
भावभक्तीकळा नाहीं मज ॥ ३ ॥
सर्व भावें आलों शरण मी तुला ।
धरी ह्या दीनाला निजकरीं ॥ ४ ॥
हनुमंतराया करी करुणेसी ।
तारी रघुनाथासी आपुलीया ॥ ५ ॥

## अभंग १२.

गुरुराया झालों तुमचा अंकीत ।
पाहु नको अंत आतां माझा ॥ १ ॥
पातकी मी घोर पातकी मी घोर ।
परी तूं अव्हेर करूं नको ॥ २ ॥
आहे मी अनाथ आहे मी अनाथ, ।
करीं बा सनाथ तव कृपें ॥ ३ ॥

दीनाचें हीनत्व आणिसील मना, ।
तरी लाज कोणा सांग बापा ॥ ४ ॥
रघुनाथ म्हणे नाहीं गरिबाचा त्राता ।
राया हनुमंता तुजवीण ॥ ५ ॥

## अभंग १३.

धेनु वत्सालागीं पाजी प्रेमपान्हा, ।
माय निज तान्हा सुखवीते ॥ १ ॥
तैसें देईं आतां माये हनुमंते ।
मज बालकातें प्रेमसुख ॥ २ ॥
पीलांचीया तोंडीं पक्षीण ते चारा, ।
घाली निरंतरा जीवनासी ॥ ३ ॥
आपुलीया पोरां कासवी सांभाळी, ।
दृष्टीची साऊली करोनिया ॥ ४ ॥
रघुनाथ म्हणे भक्त भक्तीचें पालन, ।
करी जीवप्राण निरंतर ॥ ५ ॥

## अभंग १४.

साह्य होईं आतां हनुमंतराया, ।
करीं हो उपायां संकटीं या ॥ १ ॥
दीन तुझा दास येतो काकुलती, ।
दया तुझ्या चित्तीं उपजों दे ॥ २ ॥
जन्ममरणाचे सोशिले सायास, ।
तेणें या जीवास कष्ट झाले ॥ ३ ॥
कंटाळला जीव नको गर्भवास, ।
निज सुख आस लागलीसे ॥ ४ ॥

तुजवीण माझी कोणा ये करुणा ।
पतीतपावना रघुनाथ म्हणे ॥ ५ ॥

## अभंग १५.

तव पदीं आतां समर्पिलें जाण ।
तन-मन-धन सर्व कांहीं ॥ १ ॥

आतां माझा तूंचि मायबाप धनी ।
तारक निर्वाणीं गुरुराया ॥ २ ॥

नेणें जप-तप नेणें ध्यान-पूजा ।
गुरु महाराजा काय सांगों ॥ ३ ॥

रघुनाथ म्हणे आहे अंकित मी तूझा ।
हनुमंतराजा गुरुराया ॥ ४ ॥

## आरती १६.

१

आरती हनुमंता । स्वामी सद्गुरुनाथा ॥
सच्चिदानंदकंदा । राया लक्ष्मीच्या कांता ॥ध्रु०॥
जन ते जागवीले । लाविले परमार्थ वाटे ॥
अखंड नामनादीं । पदनतासि तारिलें ॥ १ ॥

पाजळी ज्ञानदीप । हरि संसृतिताप ॥
बहूत उपकारी । निज सुखासि दीलें ॥ २ ॥

निज दासा रघुनाथा । प्रेमसुखातें देता ।
रंजवी रामनामीं । वारि प्रपंचममता ॥ ३ ॥

## आरती २.

आरती हनुमंता । स्वामी सद्गुरुनाथा ॥
त्रिभुवनीं तूंचि थोर । रामकार्या धुरंधर ॥ ध्रु० ॥
श्रीसद्गुरु रामचंद्र । महाविष्णू अवतार ॥
कलियुगीं प्रगटोनी । हातीं दिधलें भांडार ॥ १ ॥
स्वसुख घेउनीया, भक्तां दिधलें सार ।
निर्वाणीं नामस्मरण, नयनीं श्रीरामदर्शन ॥ २ ॥
धन्य धन्य गुरुरायें, नाम तारक दिधलें ।
सागर उल्लंघोनी, येणें जाणें खुंटविलें ॥ ३ ॥
रामनामें भुभुःकारी, येतो तळीं जातो वरी ।
तया सम मज वाटे वायूपुत्र निर्धारी ॥ ४ ॥
ब्रीद त्वां सत्य केलें, शरणागता उद्धारिलें ।
बाळक रघुनाथें । चरण शिरीं वंदिलें ॥ ५ ॥

---

येईं येईं बा गुरुनाथा द्या मज पदरीं आतां ॥
येईं येईं बा हनुमंता द्या मज पदरीं आतां ॥ १ ॥

# कैवल्यकुसुम.

## प्रकरण ५ वें.

कै. गु. भ. प. तात्यासाहेब यांचेवरून
भक्त मंडळींनीं केलेलीं पद्यें.

### श्रीहनुमंतनिर्याण.

### बंधुजन-दुःखोद्गार.

मालिनी.

ब[1]हु तप तप लोकीं अर्चिलें देवदेवा ॥
खचित अतुल कीं मी जोडिला पुण्य ठेवा ॥
म्हणवुनि तुज ऐसा लाभला बंधु वाटे ॥
हृदयिं परि वियोगें दुःख अत्यंत दाटे ॥ १ ॥

उबग तुजसि कैसा आमुचा सांग आला ॥
अवचित तव केवी सांडिलें प्रीय बाला ॥
कठिण मन करोनी चालिलासी कसा रे ॥
तुजविण गृह आतां भासतें वोस सारें ॥ २ ॥

स्वजन-सति-सुतांच्या तोडिलें मोह-पाशा ॥
स्वमनिं धरिलि नाहीं त्वां कधीं ही धनाशा ॥
अनलस हरिरंगें कीर्तनीं रंगुनीया ॥
खल कुजन सुपंथा लाविलें बोधुनीया ॥ ३ ॥

---

१ हे श्लोक, पुढील दोन पदें, आरती व पुस्तकाच्या शेवटीं दिले[illegible] "सांप्रदाय सोडुनि मना नको चळूं कदा" हें अष्टक कै. ती. गु[illegible] भ. प. तात्यासाहेब यांचे चुलतबंधु ती. गु. भ. प. गोपाळ राम[illegible] कोटनीस यांनीं केलेलें आहेत.

धन अमित जगीं या जोडिलें तें नयानें ॥
परि गुरुपदपद्मा वाहिलें सन्मनानें ॥
सतत सुखविलें त्वां अर्पुनी अन्न दीना ॥
किति तव गुण वर्णूं आत्मविद्यानदीना ॥ ४ ॥

प्रियतम तव भार्या सद्गुणाढ्या पवित्रा ॥
त्यजुनि सकल आप्तां अन्न ही स्वात्म पुत्रां ॥
अवचित जधिं गेली पुण्यलोकीं सुखानें ॥
तधिं हरि हरि ऐसा घोष केला मुखानें ॥ ५ ॥

" खचित सकल माया पाश ते तोडुनीया " ॥
" गुरु सदय कृपेनें मुक्त झालों जनीं या " ॥
स्मरति तव मुखींचे शब्द अद्यापि सारे ॥
मनुज कवण ऐसा तोडि माया पसारे ॥ ६ ॥

विषयिं दृढ विरक्ती अल्प आहार निद्रा ॥
निशिदिनिं तुज होती निर्गुणात्मैक्य मुद्रा ॥
किति तरि तव वर्णूं श्रीगुरूपाद-निष्ठा ॥
काशि तव मज लाभे रामभक्ती वरिष्ठा ॥ ७ ॥

त्यजुनि जड शरीरा देवता ती कुलाची ॥
अतुल खनि सुखाची प्रेममूर्तीच साची ॥
जिणुनि गृह सुताशा गेलि माताहि दैवें ॥
वदसि हरिलि माया सर्व माझी सुदैवें ॥ ८ ॥

## इंद्रवंशा वृत्त.

तूं छत्र सर्वां स्वजनास होउनी ॥
रक्षियले कष्ट सदैव सोसुनि ॥
केलें कधीं तूं नच दुष्ट भाषणा ॥
आतांचि कां होसि कठोर या जना ॥ ९ ॥

### मंदाक्रांता.

ये ये बंधो सदय हृदया केविं जासी पुढारा ॥
नाहीं नाहीं तुजविण जगीं अन्य आम्हांसि थारा ॥
बोले प्रेमें पुनरपि मुखें तो गुरूगुह्य ठेवा ॥
अंधःकारीं त्वरित घन या लावि सन्मार्ग-ठावा॥१०॥

दुःखानें हें हृदय फुटतें कंठ दाटोनि येतो ॥
नेत्रीं अश्रू अविरल फुटे शब्द तोंडीं नये तो ॥
हा हा काला कठिण-हृदया केवि काढोनि नेला ॥
बंधू माझा वद तुजसि तो कोणता लाभ झाला॥११॥

## पुत्रविलाप.

### शार्दूल विक्रीडित

हा ताता सदया सदा निज सुतां प्रेमें तुवां रक्षिलें ॥
देवोनी परमार्थ-तत्व कधिना स्वार्थी तुवां लक्षिलें ।
संसारांत निमग्न ते जनक या भूमीवरी फार रे ॥
वैराग्यें शिकवीत भक्ति असला दुष्प्राप्य हें सार रे ॥१२॥

भाग्यें त्वत्सम तात जोडुनि जगीं हें धन्य आम्हीं पहा ॥
कैसे कालकुठार निर्घृण पडे या मस्तकीं हें अहा ॥
आम्हातें परदेशि दीन करुनी निर्याण कां मांडिलें ॥
माया-प्रेम-दयालुतादि गुण हे कां या क्षणीं सांडिले ॥१३॥

ये ताता परतोनि दावि मुख तें हें शोभवी धाम हीं ॥
कैसीं भीषण त्या स्मशानिं न रुते तूंतें कठोरा महीं ॥
कोठें तूं दिसशील सांग फिरुनी या पंच भूतांतरीं ॥
कां हें दुःख असह्य आजि अमुच्या त्वां घातलें अंतरीं ॥१४॥

## स्वजनविलाप.

### इंद्रवंशा वृत्त.

केलें कसें आजि कठोर चित्त तें ॥
सांडोनि माया गृह पुत्र वित्त तें ॥

होसी स्वरूपांत निमग्न राजसा ॥
हो सागरीं सैंधव लीन तो जसा ॥ १५ ॥

हीं पंच भूतें त्यजुनी अशाश्वतें ॥
घेसी स्वरूपीं निज सौख्य सत्य तें ॥
आम्हा परीं लोटुनि दुःख-सागरीं ॥
हा हा कसा तूं वद जासि सत्वरीं ॥ १६ ॥

## शिष्यजन विलाप.

संसारार्णविं या अगाध दृढ हा तारू अम्हा जोडला ॥
मोहाचा गुरुगुह्य सांगुनि जयें तो पाशही तोडला ॥
केला मोक्ष कृपें खरा सुगम तो, तो सद्गुरू लोपला ॥
हा हा श्रीहनुमंत बोध-तरणी अस्तासि कीं चालिला॥१७॥

जो कां शांति-दया-क्षमादिक गुणीं अत्यंत की शोभला ॥
औदार्यें सुखवीत याचक जना अन्नें धनें तो भला ॥
ज्याचें ज्ञान अगाध सत्य परि जो गर्वें नसे मातला ॥
हा हा तो हनुमंत बोध-तरणी अस्तासि कीं चालिला॥१८॥

## पद. १९

( चाल--चंद्रकांत राजाची० ).

आजि कसा भगवंत कोपला दैव उलट झालें ॥
दावा साधुनि घाव घातला वर्मी निष्ठुर काळें ॥ध्रु०॥

रुधिरोद्गारी संवत्सर हें परम कठिण भासे ॥
शक अठराशें पंचेचाळिस मास शून्य ही तैसें ॥१॥

रवी वासरीं वद्य षष्ठिसीं चतुर्थ प्रहरीं दिवसा ॥
दीन आम्हासी सोडुनि गेला हनुमंत कैसा ॥२॥

ज्ञानवंत हा दयावंत हा शांत दांत दाता ॥
अनन्य भावें नमन तत्पदीं नित्य असो आतां ॥३॥

अखंड रंगुनि राम नामिं या नित्य जयें अंगें ॥
रंगविले श्रीगोपालनाथा कीर्तनाचे रंगें ॥४॥

## पद. २०

( चाल–बाळा जो जो, राग–सारंग )

येई येई बा हनुमंता ॥ सद्गुण-मंडीता ॥
करुणानिधि तूं ये ॥ कां धरसी ॥ निष्ठुरता तूं ऐसी ॥ ध्रु० ॥
विरळा मानव तो ॥ या लोकीं ॥ गुरुभक्त अवलोकीं ॥
अनन्य गुरुचरणीं ॥ अर्पुनिया ॥ तनुमधनमाया ॥
व्याघ्र सिंहाचे ॥ या जगतीं ॥ दुग्धहि जोडे यत्नांतीं ॥
परि तुजसम भ्राता ॥ नच भेटे ॥ म्हणुनि अंतर पेटे ॥ ॥
अखंड कीर्तनीं ॥ निज रसना ॥ रंगविली बा सुजना ॥
अन्नदानिं दीनांचा ॥ बहुतांचा ॥ मायबाप तूं साचा ॥
निर्मम वसलासी ॥ परिवारीं ॥ पांथापरि निर्धारी ॥ २ ॥
दीपाविण सुंदर ॥ मंदिर तें ॥ शोभा जेवि न देतें ॥
पतिविण संसारीं ॥ पतिव्रता ॥ शोभे नच गुणवंता ॥
रवि शशि ते नसतां ॥ दिन रजनीं ॥ शोभा न पवे जनीं ॥
तैसे तुजविण रे ॥ मज पाही ॥ ओस दिशा दाही ॥ ३ ॥
दुःसह शोकाच्या ॥ अजि डोहीं ॥ वियोग बुडवी पाही ॥
सखया भेटुनिया ॥ वद कांहीं ॥ शोक लयातें नेई ॥
अंत नको पाहुं ॥ या समयीं ॥ सत्वर धांवत येई ॥
या परिची करुणा ॥ परिसोनी ॥ स्वयेंचि चिद्भुवनीं ॥
प्रगट कृपें झाला ॥ हनुमंत ॥ वदला जिविंची मात ॥ ४ ॥
सावध हो बंधो ॥ अवधारी ॥ मद्वच हे निर्धारी ॥
मज तुज भेद नसे ॥ हा किमपी ॥ गोपालनाथ स्वरूपीं ॥
मी तूं ग्रासुनिया ॥ ऐक्यानें ॥ राहि समाधानें ॥
वियोग हा नेला ॥ विलयाला ॥ योगानंदाचि भरला ॥५॥

## आरती. २१

गुरुभक्ती लागी अवतरुनी जगतीं ॥
अखंड सेवा करुनी सुखविसि गुरुमूर्ती ॥

माया ममता कधिं ही धरिली ना चित्तीं ॥
वाहिले गुरुपदिं प्रेमें तनु मन संपत्ती ॥ १ ॥
जय देव जयदेव जय श्रीहनुमंता ॥
आरती ओवाळूं आतें गुणवंता ॥ ध्रु० ॥
रंगुनि कीर्तनिं स्वयें भाविक रंगाविले ॥
मूढ जनहीं बोधें सांप्रदायि केले ॥
गूढ ज्ञान तत्व सुगम जना केलें
गुरुभजनीं मन हें अखंड रमवीलें ॥ २ ॥
तरुनी स्वयें निजकुळ उद्धरीलें ॥
परमार्थाचें बीज जगांत पेरियलें ॥
सत्पद चित्पद दोनी आनंदिं मिळवीलें ॥
गोपालनाथ पदीं ऐक्य साधीलें ॥ ३ ॥

## पद १.

( चाल--स्वकुल-तारक सुता राग--भीमपलासी )

[1]नमन सद्गुरुपदा । सुखदा ॥
फिरुनि फिरुनी करिन शतदा ॥ ध्रु० ॥
हनुमंताच्या कृपाप्रसादा साठीं चढलों
भजकपदा ॥ १ ॥
अनन्य-भावें चिंतन करिताचि, साधुदास
कवि घे मोदा ॥ २ ॥

## पद. २

( चाल--उद्धवा शांतवन कर जा त्या गोकुळवासि जनांचें )

[2]पाहुनी हनुमंतातें । मन माझें तल्लिन झालें ॥ ध्रु० ॥
दर्शना तयांच्या जातां । मम मनीं नवल बहु वाटे ॥
पाहुनी विमल पदकमलें । मम देहीं रिपु मावळले ॥
चाल-गुरुकृपा पूर्ण वेल्हाळा ॥
रामनामें हटवी काळा ॥
गौरवर्ण पाहुनी पिवळा ॥
हृदयीं मम भरतें आलें ॥ पाहुनी ॥ १ ॥
प्रेमाश्रु सदा दाटोनी । मुखकमलचि हास्यें विलसे ॥
उजळिल्या दशादिशा कैशा । भव्य मूर्ति ती परि तेजें ॥
चाल-रेवणसिद्ध त्यांपासोनी ॥
गुरुपरंपरा चालवुनी ॥
भक्त अंतरंग बघुनी ॥
भवभीतातें शांतविलें ॥ पाहुनी० ॥ २ ॥

---

१ हें पद साधुदास यांनीं केलेलें आहे.

२ हें पद व पुढील पद गणेश सिताराम वझे रा. सांगली यांनीं केलेलीं आहेत.

रामचंद्र प्रिय मूर्ती ती ॥ गूढसें मृदु बहु बोले ॥
मुखिं बोले मंजुळ वाणी ॥ जाणुनी भक्तहेतूतें ॥

चाल–भक्तांच्या प्रेमासाठीं ॥
हे ब्रह्म सदनिं ये भेटी ॥
गुरुदासा आवडी मोठी ॥
पदनमना भाग्य उदेल ॥ पाहुनी० ॥ २ ॥

## पद ३.

( चाल–पूर्ण प्रतापा भक्तवत्सला ज्ञानरूप ताता. )

हनुमंतराजा सद्गुरुमूर्ति स्वामी गुरुराया ॥
धाव दयाळा भवपंकांतुनि मजला ताराया ॥ ध्रु० ॥

नित्य ओघ तो कीर्तनिं चाले नामाचा थोर ॥
कल्पवृक्ष तूं भक्तजनांतें असशी बा थोर ॥
ज्ञान तें ॥ ध्यान तें ॥ शिकवी हनुमंता ॥ शिकवी गुणवंता ॥
धन्य जगीं या होण्यास्तव तारी मज आतां ॥ १ ॥

बुद्धिमंद मी उपमा मातें शोभे लोहाची ॥
परिस असासि तूं देइ योग्यता मजला हेमाची ॥
सत्य तें ॥ देइ तें ॥ मजला हनुमंता ॥ मजला गुरुनाथा ॥
नामामृत तें नित्य पाजूनी रक्षीं मज आतां ॥ २ ॥

हनुमंता मी श्रमलों आतां दुःखद संसारीं ॥
धन्य जगीं या मजासि कराया सत्वर तूं तारी ॥
दास तो ॥ ठेवितो ॥ त्वच्चरणीं माथा ॥
गुरुचरणीं माथा ॥ शरण मी येई ॥
मजला आपण लोटुं नका आतां ॥ ३ ॥

## श्लोक ४

ह[1]नुमंत-पायीं मना राही आतां ॥
तुला घेउनी जाय तो मुक्तिपंथा ॥
असा तो दयालु आठवीरे ॥
तुला संकटीं सोडवी देव तो रे ॥ १ ॥

सदा सर्वदा सद्गुरु नाम ध्यावें ॥
सदा सर्वदा रूप त्याचें पहावें ॥
सदा सर्वदा भक्तिनें आळवावा ॥
हनुमंत तो साधनें डोलवावा ॥ २ ॥

हनुमंतरायें मज बोध केला ॥
मनोवृत्तीचा सर्व तो शीण गेला ॥
असा तो दयाळू मना आठवी रे ॥
तयाचे पदीं लीन होई बा रे ॥ ३ ॥

## आर्या ७.

अ[1]ज्ञ जना ताराया संता येणें असें हरी वदले ॥
सद्य स्थिती ही पाहतां सांप्रत तैसे महंत मज गमले ॥१॥
गुरु-अंजनीच दृष्टी स्थिर करतांना घडे हा अवतार ॥
हनुमंत नाम साजे जन उद्धरण्या आलेचि साचार ॥२॥
विद्वत्ता बहु असुनी वर्तन साधें किती तरी वानूं ॥
भूत दया अति तरती ज्ञानी शोभति जसा नभीं भानू॥३॥
गुरुसेवा रूपानें हीना दीना प्रमोद हा करिती ॥
द्वादश वर्षे ऐसें कीर्तन चाले गुरुकृपें वरती ॥ ४ ॥

---

१ हे श्लोक विठ्ठल रघुनाथ लोटलीकर रा. सांगली यांनीं केलेले आहेत.

१ ह्या आर्या रा. अनंत गंगाधर केळकर राहणार सांगली यांनीं केलेल्या आहेत.

कीर्तनीं उभेंची राहतां गुरुमूर्ती बोलवी असें वाटे ॥
ऐशा स्फुरणप्रकाशें कीर्तनीं रंगची नवा नवा दाटे ॥५॥
सर्वा संतांचीं तीं वाक्यें दावुनी दृढामती करिती ॥
सूक्ष्मार्था स्पष्ट करुनी देहावरीं त्या आणोनि दाविती॥६॥
कीर्तन त्रिवेणीसंगमीं ज्ञात्यांना घालिती सदा स्नान ॥
धन्य ते त्यांतही जनते नाममिश्रित जया सुधापान ॥७॥
शक अठराशें सत्तिगीं विभूती मासींच कृष्ण षष्ठीसी ॥
सोमवार शुभ पाहूनि गुरुनाथें घातलेंचि पाठीशीं ॥८॥
हीन दीन मी असतां गुरुरायें मज कृपेचि करिं धरिलें ॥
भवव्याधी हा निरसुनि अनंताला अनंताचि केलें ॥ ९ ॥

## नमस्कार. ६

[1]कलिमाजी जन बहु दोषी होती ।
तया कारणें संत अवतार घेती ॥
नव्हे मानवी पुण्य पुरुष जगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ १ ॥

जना भासवी दक्ष प्रपंची जैसे ।
परी अंतरीं पूर्ण विरक्ती असे ॥
दया शांति क्षमा वैराग्य अंगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ २ ॥

मनीं ब्रह्मीं विचार हा चालतासे ।
हरी कीर्तनीं तनू खेळलीसे ॥
सदा आवडी नित्य निर्गुण संगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ३ ।

---

१ हे नमस्कार गं. राधाबाई चाफेकर राहणार सांगली यांनीं केलेले आहेत.

निजबोधें मेघवर्षाव चाले ।
हरीनामीं प्रेमें बहू पीक आलें ॥
अशा साधकीं साधिली ही सुगी ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ४ ॥

बहू हीन अज्ञ जन ते भुकेले ।
हरीनामीं सत्रीं जेवुनि तृप्त जाहले ॥
अशा भोजनीं जाहलो आम्ही निरोगी ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ५ ॥

धन्य ही नगरी धन्य येथील जन ।
निष्काम कथा अखंडीत श्रवण ॥
हरे दैन्य तापासी भव भीत भंगी ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ६ ॥

सांगलींत राहे गुरुभुवन जाई ।
पुन्हां जन्म मरणासी येणेची नाहीं ॥
जडजीव उद्धार झालासे सुयोगी ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ७ ॥

नयनीं पाहतां बहु हर्ष होई ।
चरणदर्शनें चित्तवृत्ति हरे ही ॥
असे चरण ते ठेवूं हृदयांत वेगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ८ ॥

असें ग्राम नाहीं असें नाम नाहीं ।
गुरुभक्तिची पूर्ण झाली सिमाही ॥
प्रसादिक वाणी बहु प्रेम अंगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ९ ॥

निजानंद राहुनी जना आनंद देई ।
असा संत विरळाचि जगतांत पाहीं ॥
बहु सौख्य वाटे सज्जनाचेनि संगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ १० ॥

ॐ

अहा राम ओखटी वेळ आली ।
समस्ताचि टाकुनि गुरुमाय गेली ॥
बहू लेकुरें लोटिलीं दुःप्रसंगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ ११ ॥

गुरु रामराया जाणुनि भक्त हृदया ।
सांगलीस धाडिलें योगिराया ॥
तनु ठेविली सांगली पुण्य जागीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ १२ ॥

पुरे पुरे हा प्रपंच वारी ।
सदा लक्ष राहो गुरु श्रवणद्वारीं ॥
तव चरण रजःकण अंगीं ।
नमस्कार माझा हनुमंत योगी ॥ १३ ॥

---

गुरो विनति मी करी हृदयमंदिरीं या वसा ॥
समस्त जग हें गुरूस्वरुपची ठसो मानस ॥
करो सतत सत्कृती मतिहि दे जगत्पावना ॥
समर्थ हनुमंत भो पुरवि मन्मनोवासना ॥ १ ॥

दास.

## पद ८.

( चाल—सखया मी देई आतां तवं प्रश्ना उत्तरा )

[1]हनुमंता संतराया गुरुस्वरूपीं विवसी ॥
जडदेहा टाकूनिया चिरशांतीं पावसी ॥ ध्रु० ॥

भवव्याधी विसरूनिया कीर्तनिं जो डोलतो ॥
कीर्तनीं तो खंड नाहीं अज्ञजना बोधितो ॥
दीनांचा तात जो तो केवि आतां भेटसी ॥ १ ॥

संसारा असुनि केंवि परमार्था साधिती ॥
दावियली निजकृतीनें मूढजना प्रचिती ॥
प्रेमभावें चित्तवित्ता गुरुचरणीं अर्पिसी ॥ २ ॥

कलियुगीं सुलभ ऐसा पथ जना दाविला ॥
नाममंत्र इच्छिताना सदया त्वां दीधला ॥
भव जलधी तरुनी जाया गुरुमार्गा लाविसी ॥ ३ ॥

पौष कृष्ण षष्टी दिनी ब्रह्मरूपीं जाहला ॥
सांगलीचा बोधरूपी रवि आजि लोपला ॥
शाश्वतशा कीर्तिरूपें जगीं आतां विचरशीं ॥ ४ ॥

वर्णाया ज्ञान नाहीं नच वाचे मधुरता ॥
भवतापें तापली ही गोपालाची सुता ॥
गुरुनाथा घन कृपेचा मजवरी कैं वर्षसी ॥ ५ ॥

---

१ हें पद सौ. आनंदीबाई लेले राहणार बेळगांव, यांनीं ता. २७-१-१९२४ रोजीं केलेलें आहे.

## श्रीमत् सद्गुरु परमपूज्य ती. हणमंतरावजी कोटनीस महाराज यांचें निर्याण.

ऐका हो सज्जन अठराशें पंचेचाळिसांत।
रुधिरोद्गारी संवत्सरांत उत्तरायण ॥ १ ॥

हनुमंतरायांनीं ठेवियला देह ।
पौष वद्य षष्ठी आणि रविवार ॥ १ ॥

दिवसां चौथे प्रहरीं केलें हो निर्याण ।
स्वरूपीं तल्लिन ऐक्य झालें ॥ ३ ॥

ऐक्य झालें तेणें दिवस गोड झाला ।
जनीं या जोडला नारायण ॥ ४ ॥

रामरूपीं हनुमंत मिळोनिया गेले ।
कीर्तिरूपें उरले दासापाशीं ॥ ५ ॥

---


१ पौष व. ६ शके १८४५ रोज रविवार. (ता. २७ जानेवारी १९२४.)


श्री

कै. ती. गु. भ. प. हणमंतरावजी कोठनीस यांची जन्म-कुंडली व राशीकुंडली स्पष्ट ग्रहांसह खालीं दिल्या आहेत.

शके १७८६ कार्तिक शु. ८ सूर्योदयात् गत घ. ७ प. ५६

जन्मकुंडली. राशिकुंडली.




जन्मकालचे स्पष्ट ग्रह.

| र. | चं | मं | बु. | गु | शु. | श. | रा. | के | ल. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | १ | ६ | ७ | ७ | ६ | ६ | ० | ८ |
| २२ | २६ | २१ | २० | १३ | १४ | ४ | १७ | १७ | ५ |
| ५५ | ४५ | ५२ | २६ | १६ | २२ | ३६ | ७ | ७ | ४६ |
| ५९ | ४३ | २६ | १८ | २२ | १७ | २७ | ४१ | ४१ | ४७ |

जन्म सोमवार तारीख ७ नवंबर सन १८६४ सं. सांगली पैकीं तेरदळ येथें.

## सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा.

### चामरवृत्त.

सद्गुरूपदीं धरी अनन्य भाव तूं मना ॥
हा गुरूपदेश वेदसार जाणरे मना ॥
प्राण चित्त वित्त देह वाहि तुं गुरूपदा ॥
सांप्रदाय सोडूनी मना नको चळूं कदा ॥ १ ॥

वांछुं तूं नको परस्त्रिया परावि या धना ॥
ज्ञान गर्व वाहुनी न निंदि साधु सज्जना ॥
क्रोध काम लोभ मोह सांडि टाकि दुर्मदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ २ ॥

भ्रांति सोड शांति जोड प्रेम घेई चिंतनीं ॥
ठेवि शास्त्र आत्मसद्गुरू प्रतीति घेउनी ॥
विश्वसूनि तुं गुरू प्रबोधिं राहिरे सदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ३ ॥

तुं भुलोन अन्य सांप्रदाय सेविसी जरी ॥
तो न होय मोक्षदायि दे अधोगती खरी ॥
दंभ दर्प हे त्यजूनि सेवि दैवि संपदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ४ ॥

मृत्युभीति नित्य वाहि सावधान तूं रहा ॥
स्वात्मभाव भूतमात्रिं सर्वदा हि तूं पहा ॥
नित्य नेमसाधनीं धरी हरील आपदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ५ ॥

लाज तूं धरूं नको गुरुगृहांत राबता ॥
श्वान होइ तुं गुरूप्रसाद नित्य सेविता ॥
सद्गुरूपुढें कदा नकोचि दाउं श्रीमदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ६ ॥

ब्राह्म आधिं हा मुहूर्त साधि ऊठ तूं त्वरें ॥
वेदगर्भ बीज निष्ठ रामनाम गाइरे ॥
ध्यानिं चिंति जाश्वनीिं राममूर्ति तुं बुधा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ७ ॥

श्रीगुरूपदाभिवंदना प्रभातिं तूं करी ॥
व्याधि जन्म मृत्यु वारि पादतीर्थ तूं वरी ॥
स्वात्मरूपिं तुं समाधि नित्य घेई मुक्तिदा ॥
सांप्रदाय सोडुनी मना नको चळूं कदा ॥ ८ ॥

## श्लोक.

### वसंत तिलक

कैवल्यपुष्प-उर हा तव दिव्य कंठीं ॥
अर्पूनि मी सतत साधनिं काल कंठीं ॥
प्रेमें पदीं शरण होउनि मागतों मी ॥
दे ठाव जन्म मृति वारुनि आत्मधामीं ॥ १ ॥

रघुनाथ कोटनीस.

राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराजकी जय.

REFBK-0002848

REFBK-0002848

समाप्त.

# सूची.


| पद्य. | पान |
|---|---|
| **अ.** | |
| अनंत पुण्येंनी | ५ |
| अवचित देवें | ५ |
| अद्वय ब्रह्म | १ |
| असो माझी | ५ |
| अज्ञ जना | ७ |
| **आ.** | |
| आजि कसा भगवंत | ६ |
| आरती हनुमंता | ६ |
| आरती हनुमंता | ६ |
| आरामधाम प्रभु | ३ |
| आश्विनांत वद्य | ३ |
| **उ.** | |
| उपनयनविधीं | ३१ |
| **ऐ.** | |
| ऐका हो सज्जन | ७६ |
| **क** | |
| कलिमाजी बहु | ७१ |
| कां न पावसि | ५७ |
| काय वर्णूं या | ११ |
| काया निक्षेपण | ४६ |
| कीर्तन ऐकोनी | ५३ |
| कीर्तनगुणें होत | १४ |
| कुडी म्हणे तूं | ११ |
| केला वाल्मिकानें | ४५ |
| केलें कसें आजि | ६४ |
| कैवल्य पुष्पसर | ७८ |
| कोणाचा देव | २० |
| कोण्या पुण्यें | ३४ |
| कृष्ण वदे | २७ |
| **ग.** | |
| गजवदना तूं | ८ |
| गुरुभक्ती लागीं | ६६ |
| गुरुराया झालों | ५८ |
| गुरो विनति | ७३ |
| **घ.** | |
| घडघडाट रथ चाले | २१ |
| **च.** | |
| चला बाई गुरुपायीं | १६ |
| चिमडच्या मठीं | ४९ |
| चिमड क्षेत्रीं | २ |
| **ज** | |
| जनीं रामसेवा | २९ |
| जववरी सद्गुरु | २४ |
| जिवलग माझ्या | ५५ |
| जैशा श्रीराम पादुका | ५१ |
| **झ.** | |
| झालों झालों | ५७ |
| **त** | |
| तव पदीं आतां | ६० |
| तुझिया चरणीं | ५७ |
| तूं छत्र सर्वां | ६३ |
| **द,** | |
| देवा पुरे पुरे | २८ |
| **ध,** | |
| धन्य धन्य | ५२ |

| पद्य. | पान |
|---|---|
| धन्य निंबरगी ... ... | ३ |
| धेनुवत्साळागीं ... ... | ५९ |
| **न.** | |
| नको गुरुराया ... ... | ५८ |
| नमन सद्गुरुपदीं ... | ६८ |
| नमोस्तुते निरंजनाय ... | ३२ |
| नव्हे तेज वायू ... ... | ३६ |
| नाऊ धन्य ... ... | २९ |
| नारद बोलत ... ... | २४ |
| **प.** | |
| पति सासू श्वशुर ... | ४३ |
| पादुका मिळाल्या ... | ५० |
| पाप पर्वत ... ... | ५२ |
| पावें पावें हनुमंता ... | ५६ |
| पाहुनी हनुमंतातें ... | ६८ |
| प्रथम नवमि आली ... | ३२ |
| प्रथम शरण ... ... | ५५ |
| प्रसाद करुणाघना ... | ३१ |
| **ब.** | |
| बसूं या साधनाला ... | १६ |
| बद्धांजुली कृत ... ... | ३३ |
| बहु तर तप ... ... | ६२ |
| बहु दयावंत ... ... | ५६ |
| बावन्नकोटी जपसंख्या ... | ४१ |
| बावन्नकोटी जप... ... | ४२ |
| ब्रह्मपुरी ... ... | ५४ |
| बोले स्वामी ... ... | ३३ |
| **भ.** | |
| भिष्म वदे ... ... | २७ |
| भूमि नव्हे तो ... ... | ८ |
| **म.** | |
| माया-महोदधित ... ... | ३३ |
| मारुति पुसे ... ... | २५ |
| मी हीन सर्वांपरी... ... | ३९ |
| मृत्युलोकीं नरदेह ... | ४६ |
| **य.** | |
| येई येई बा ... ... | ६६ |
| ये ये बंधो ... ... | ६४ |
| येवढें कोडें ... ... | २५ |
| **र.** | |
| रघुनाथप्रिय ... ... | ५ |
| रघुनाथप्रिय गुरुवर ... | ३ |
| रथ फिरुनि मठातें ... | ३१ |
| रामराय राममाय... ... | ३५ |
| राम सिंहासनी ... ... | २६ |
| रुक्मिणीनें जी ... ... | २६ |
| **ल.** | |
| लोकीं या गुरुभक्ति ... | ३९ |
| **व.** | |
| वामनाची वाणी ... ... | ४३ |
| विहीर साधुरायाची ... | ४ |
| **श.** | |
| शकाब्द अठरा ... ... | ३४ |
| शुचिर्भूत शुद्धमती ... | १३ |
| श्रीराम अवतरला ... | ६ |
| श्रीराम सद्गुरु ... ... | ३० |
| **स.** | |
| सखी सांगते ... ... | ९ |
| सद्गुरुची आज्ञा... ... | ४८ |
| सद्गुरुची कृपा ... ... | ४५ |
| सद्गुरुंनीं दया ... ... | १ |
| सद्गुरुपदीं धरीं ... ... | ७७ |
| सद्गुरुराज पहा... ... | २८ |
| सद्गुरु वचनें ... ... | १८ |
| सद्गुरुचा विश्वास ... | ४१ |
| समर्थ सद्गुरु ... ... | ४७ |

| पद्य. | पान |
|---|---|
| सद्गुरुच्या हातें ... ... | ४० |
| सांगा तुम्ही ... ... | २० |
| साह्य होई... ... ... | ५९ |
| संसारवृक्ष हा ... ... | १३ |
| संसारार्णवि या ... ... | ६५ |
| स्थिर स्थीर होई... ... | १५ |
| स्वरूप निर्मळ ... ... | १७ |
| स्वयंभ सदना ... ... | ५ |
| स्वरूपसंपत्ती ... ... | ४८ |
| **ह.** | |
| हनुमंतराजा ... ... | ६९ |
| हनुमंतराया ... ... | ५६ |
| हनुमंतरायासी ... ... | ४४ |
| हनुमंत पायीं ... ... | ७० |
| हनुमंताचा राय ... ... | ४४ |
| हनुमंता संतराया... ... | ७४ |
| हरिदिनि निशिमाजी ... | ३४ |
| हरिनामाची ... ... | २२ |
| हरिहर मूर्ति ... ... | १९ |
| हरोनि आपदा ... ... | ४७ |
| हा ताता सदया ... ... | ६४ |
| हा हा रामा ... ... | ३५ |
| हंसावरती राम ... ... | ६ |
| हृदय पिटित ... ... | ३४ |


अनंत कोटी ब्रह्मांडनायक

॥ राजाधिराज श्रीसद्गुरुनाथ महाराजकी जय. ॥

दा. क्र. 208
मुंबई शाखा